विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. ५ एप्रिल २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१३१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


**सुविचार**

यदि आप हमेशा ऊंची दृष्टि रखते हैं तो आपका मस्तक स्वत: ऊंचा रहेगा।

(ब्रह्मकुमारीज)

# महायुती आणि महाविकास आघाडीच्या मतांमध्ये घट होणार



मुंबई : महाराष्ट्राच्या निवडणूक आखाड्यात एनडीए महायुती आणि इंडिया महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता आहे. प्रत्येक पक्ष उमेदवार घोषित करत आहेत. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांना घेरण्याची तयारी करत आहेत. मात्र राज्यातील जनतेचा मूड काय आहे? त्यांना काय वाटतं? ते कुणाला बहुमत देतील? यासारख्या विविध प्रश्नांवर एबीपी सी व्होटरने सर्व्हे केला आहे. त्यातील ओपिनियन पोलमधून समोर आलेले आकडे पाहून महायुतीसह मविआलाही टेन्शन येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील महायुतीत भाजपासह एकनाथ शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी, रामदास आठवलेंची आरपीआय, महादेव जानकरांचा रासप सहभागी आहे. तर इंडिया प्रणित महाविकास आघाडीत काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी, ठाकरेंची शिवसेना सहभागी आहे. मतांच्या टक्केवारीकडे पाहिले तर याठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडीत यांच्यात काटे की टक्कर होताना दिसते. दोन्हीही युती, आघाडी समसमान ४१ टक्के मते घेण्याचा अंदाज आहे. त्यात १८ टक्के मते ही अन्य पक्षांच्या खात्यात जाऊ शकतात.

महिन्याच्या तुलनेत कोणाला किती मते?

महायुती आघाडी इतर

एप्रिल ४१ टक्के ४१ टक्के १८ टक्के

मार्च ४३ टक्के ४२ टक्के १५ टक्के

मार्च आणि एप्रिल महिन्याच्या आकडेवारीची तुलना केली तर, एनडीए महायुतीला २ टक्के मतांचा फटका बसतोय. एनडीएला मार्चमध्ये ४३ टक्के मतांचा अंदाज होता. हा आकडा एप्रिलमध्ये घसरून ४१ टक्क्यांवर आला आहे. तर इंडिया महाविकास आघाडीलाही १ टक्क्यांचे नुकसान होताना दिसते. मार्चमध्ये ४२ टक्के तर एप्रिलमध्ये ४१ टक्के मते महाविकास आघाडीला मिळतील असा अंदाज आहे. तर अन्य पक्षांच्या खात्यात ३ टक्के मतांचा फायदा होताना दिसतोय. मार्चमध्ये इतरांच्या खात्यात १५ टक्के मते होती जो आकडा आता एप्रिलमध्ये १८ टक्क्यांवर पोहचला आहे.

## नेपाळमार्गे भारतात घुसणाऱ्या पाकिस्तानी दहशतवाद्यांना अटक

लखनौ : उत्तर प्रदेश एटीएसने भारतात घुसखोरीचा मोठा प्रयत्न हाणून पाडला. नेपाळमार्गे भारतात घुसखोरी करणाऱ्या तीन दहशतवाद्यांना युपी एटीएसने ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांमध्ये २ पाकिस्तानी आणि १ काश्मिरी दहशतवादी असून ते तिघही हिजबुल मुजाहिदीन आणि आएसआयशी संबंधित आहेत. विशेष म्हणजे, यूपी एटीएसला काही दिवसांपूर्वीच या घुसखोरीची गुप्त माहिती मिळाली होती.

एटीएसने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकानुसार, दोन पाकिस्तानी आणि एक काश्मिरी दहशतवादी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या मदतीने नेपाळमार्गे भारतात घुसण्याच्या तयारीत होते. या तिघांनी

(पान ७ वर)

# अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा



नवी दिल्ली : मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची याचिका उच्च न्यायालयाने आज फेटाळली आहे. अरविंद केजरीवाल यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची मागणी करणारी दुसरी जनहित याचिका स्वीकारण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

केजरीवाल यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याचे निर्देश देणारी जनहित याचिका (पीआयएल) स्वीकारण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने आज (गुरुवारी) नकार दिला.

अरविंद केजरीवाल यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याचे निर्देश देणारी जनहित याचिका हिंदू सेना नावाच्या संघटनेचे अध्यक्ष असलेल्या विष्णू गुप्ता यांनी दाखल केली होती. गुप्ता यांनी दिल्ली अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंडिलग प्रकरणात अटकेचे कारण देत केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याची मागणी केली.

कोर्टाने सांगितले की, ते या मुद्यावर निर्णय घेऊ शकत नाहीत आणि दिल्लीचे लेफ्टनंट गव्हर्नर (एलजी) किंवा भारताचे राष्ट्रपती यावर निर्णय घेऊ शकतात.

सरकार काम करत नाही हे आपण कसे म्हणू शकतो? दिल्लीचे लेफ्टनंट गव्हर्नर हे निर्णय घेण्यास पूर्णपणे सक्षम आहेत. त्यांना (एलजी) आमच्या मार्गदर्शनाची गरज नाही. त्याला सल्ला देणारे आम्ही कोणी नाही. कायद्यानुसार जे काही करायचे ते करतील, असेही न्यायालयाने सांगितले आहे.

न्यायालयाने पुढे सांगितले की, ते यामध्ये हस्तक्षेप करणार नाही आणि भारताचे राष्ट्रपती किंवा एलजी यावर निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे याचिकाकर्ता संबंधित प्राधिकरणाकडे जाऊ शकतो, असे त्यात म्हटले आहे. त्यानंतर याचिकाकर्त्याने याचिका मागे घेतली.

# निलंगा मतदार संघात खा.शृंगारेंच्या गाठीभेटी



लातूर/ प्रतिनिधी- भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराचे संयोजक, माजी मंत्री आणि आमदार श्री. संभाजीराव पाटील निलंगेकर द्वारे आयोजित महा विजय २०२४ अभियानांतर्गत मतदारांच्या निलंगा विधानसभा मतदारसंघात गाठीभेटी घेण्यात येत आहेत निलंगा विधानसभा मतदार संघातील अनेक प्रतिष्ठित नेते, व्यापारी, डॉक्टर्स, शैक्षणिक संस्था, शुभ मंगल कार्य अशा भेटी देऊन नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून महायुती सरकार विकसित भारत ही संकल्पना राबविण्यात यशस्वी झाली असून पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करून देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी आपली साथ आवश्यक आहे असे आवाहन श्री. सुधाकरराव श्रृंगारे यांनी केले.

माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या समवेत निलंगा शहरात छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास वंदन करून कार्यकर्ता दौऱ्याचा शुभारंभ केला. तदनंतर शहरात आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निवासस्थानी स्नेह भेट. पीर पाशा दर्गा येथे चादर अर्पण, निळकंठेश्र्वर मंदिर व विठ्ठल रुक्माई मंदिर येथे मनोभावे दर्शन, यांच्या निवासस्थानी स्नेह भेट देऊन परिसरातील नागरिकांशी मुक्त संवाद साधला .

निलंगा शहरातील भगवान गौतम बुद्ध, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, माजी मुख्यमंत्री कर्मयोगी डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना नमन, सुप्रसिद्ध व्यापारी प्रल्हाद बाहेती निवासस्थान, मुशिर कादरी यांचे हॉटेल, चाऊस यांच्या हॉटेल व निवासस्थान, ज्येष्ठ मान्यवर श्री. निळकंठ पेटकर, श्री. वीरभद्र स्वामी, निलंगा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांच्या निवासस्थान आदी ठीकाणी वंदन आणि स्नेह भेटी केल्या. (पान ७ वर)

# घड्याळ चिन्ह वापरता येणार नाही



नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि अजित पवार गटाने १९ मार्च २०२४ रोजी पक्ष चिन्हाबाबत दिलेल्या अंतरिम आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट हे नाव वापरावे. तुतारी फुंकणारा माणूस हे पक्ष चिन्ह वापरावे. तसेच शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी किंवा समर्थकांनी घड्याळ चिन्ह वापरू नये, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

पक्षचिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीवेळी शरद पवार गट आणि अजित पवार गट या दोन्ही गटांना समज देण्यात आली आहे. शरद पवार गटाच्या वतीने अभिषेक मनू सिंघवी यांनी सुनावणी सुरू होताच अजित पवार गटाने छापलेल्या काही जाहिराती, पोस्टर्स, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियावरील जाहिराती सादर केल्या. या सर्वांमध्ये घड्याळ चिन्हाबाबत डिस्क्लेमर देण्याचे न्यायालयाने दिलेले निर्देश पाळले गेले नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने घडयाळ हे चिन्ह आम्हाला वापरायला दिले आहे, असा खोटा प्रचार, प्रसार करत अजित पवार गटाने दिशाभूल केली, ही बाब निर्दर्शनास आणून दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने घड्याळ चिन्हाचा वापर करताना, हे चिन्ह न्यायप्रविष्ठ असल्याबाबत जाहिराती किंवा जिथे जिथे वापर होईल, तिथे हे नमूद करणे अत्यावश्यकच आहे. तसेच न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे अजित पवार गटाने काळजीपूर्वक पालन करावे, अशी समजही न्यायालयाने दिली आहे. घड्याळ हे चिन्ह न्यायालयाचा निकाल येईपर्यंत असेल, असे ठळकपणे लिहावे असे स्पष्ट निर्देशही दिले आहेत.

न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्याची हमी

सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत, अजित पवार गटाने घड्याळ चिन्हाचा वापर करताना हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याबाबतची बाब छोट्या अक्षरात छापली होती, ही गोष्ट शरद पवार गटाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर अजित पवार गटाच्या वतीने बाजू मांडणाऱ्या मुकुल रोहतगी यांनी अधिक ठळकपणे संबंधित मजकूर छापला जाईल. तसेच यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन केले जाईल, अशी हमी दिली. तसेच न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची (पान ७ वर)

# बंडखोर इच्छुकांना गळाला लावण्याचा वंचितचा प्रयत्न

नाशिक : नाशिक मतदारसंघात सुरुवातीपासूनच अनपेक्षित घडामोडी घडत असल्याने, या मतदारसंघातील पुढील चित्र अजूनही अस्पष्टच आहे. महाविकास आघाडीने ऐनवेळी उमेदवार बदलून उमेदवारीची माळ दुसऱ्याच्याच गळ्यात टाकल्याने मविआत काहीसे तणावाचे वातावरण आहे. तर दुसरीकडे महायुतीचा उमेदवार ठरता ठरत नसल्याने, मतदारसंघातील गोंधळ कायम आहे. या सर्व परिस्थितीवर ङ्गवंचितफ डोळा ठेवून असून, बंडखोरीच्या तयारीत असलेल्या इच्छुकांना गळाला लावण्याचा वंचितचा प्रयत्न आहे.



महाविकास आघाडीसोबतची बोलणी फिसकटल्यानंतर वंचितचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वतंत्र उमेदवार देण्यास सुरुवात केली आहे. विदर्भात सात उमेदवार घोषित केल्यानंतर, मंगळवारी त्यांनी आणखी पाच उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे.

यामध्ये सर्वाधिक पुणे लोकसभा मतदारसंघातून वसंत मोरे यांचे नाव चर्चिले जात आहे. (पान ७ वर)

# नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध

नवी दिल्ली : अमरावतीच्या खासदार नवनीत कौर राणा यांच्या अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र बोगस ठरवणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत राणांना मोठा दिलासा दिला आहे. नवनीत राणा अमरावती लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून आज उमेदवारी अर्ज भरणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर त्यांचा निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



नवनीत राणा यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सुप्रीम कोर्टाने जात प्रमाणपत्र वैध ठरवले आहे. आता त्यांचा निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र बोगस ठरवले होते. २०१९ मध्ये उमेदवारी अर्ज भरताना बनावट जात प्रमाणपत्र दिल्याचा आरोप राणा यांच्यावर करण्यात आला होता. दरम्यान आज सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरवले आहे.

नवनीत राणा भाजपच्या कमळावर अमरावतीतून खासदारकीची निवडणूक लढवणार आहेत. त्यांनी प्रचाराला देखील सुरुवात केली आहे. त्यांनी आज मंदिरात जाऊन दर्शन घेतले. आज त्या उमेदवारी अर्ज देखील भरणार आहेत. गेल्या महिन्यात, सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्र रद्द करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील निर्णय राखून ठेवला होता. ८ जून २०२१ रोजी उच्च न्यायालयाने सांगितले की, मोची जात प्रमाणपत्र बनावट कागदपत्रांचा वापर करून फसवणूक करून मिळवले गेले. (पान ७ वर)

# तीन आमदारपत्नींना महायुतीकडून उमेदवारी

## उस्मानाबादमधुन आर्चना पाटील

मुंबई : लोकसभा निवडणुकांसाठी उमेदवारांचे अर्ज भरायला सुरुवात झाली असून प्रचाराची रणधुमाळीही सुरू झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीकडून अद्यापही काही उमेदवारांची घोषणा होत आहे. राज्यातील ४८ पैकी काही महत्त्वाच्या जागांवर जागावाटपातील तिढा कायम आहे. त्यामुळे, हळुहळु उमेदवारांची घोषणा सुरू आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने आज बीड आणि भिवंडी मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा केली. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही धाराशिव लोकसभा मतदारसंघातून उमेदवाराच्या नावाची घोषणा केली.



भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना धाराशिवमधून उमेदवारी देण्यात आली आहे. धाराशिव लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून ओमराजे निंबाळकर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यानंतर, ओमराजेंनी प्रचारालाही सुरुवात केली. मात्र, त्यांच्याविरुद्धच्या उमेदवारांसाठी धाराशिवकरांना मोठी वाट पाहावी लागली. त्यानुसार, आज अर्चना पाटील यांचा (पान ७ वर)

# चाकुरने नेहमीच काँग्रेस पक्षाचा विचार तेवत ठेवण्याचे काम केले आहे : अमित देशमुख




लातूर /प्रतिनिधी :- काँग्रेसचा पक्षाचा विचार नेहमीच तेवत ठेवण्याचे काम चाकुरने केले आहे. यामुळे चाकूर हे काँग्रेसचे मूळ आहे, चाकूरने काँग्रेस पक्षाचे काम करण्यासाठी आम्हाला नेहमीच प्रेरणा दिली आहे. देशात लोकसभेची निवडणूक ही एनडीए विरुद्ध इंडिया होत आहे. तर राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी होत आहे, हा वैचारिक लढा आपण देश, राज्य जिल्हा वाचवण्यासाठी लढत आहोत असे लातूरच्या राजकारणाची उज्वल परंपरा आहे, त्यामुळे लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठीशी आपण सर्वांनी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

बुधवार दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी लातूर-नांदेड रोडवरील जुना बस स्टॅन्ड चाकूर येथे महाविकास आघाडीतील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून महाविकास आघाडीचे लातूर लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी काँग्रेसचे अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, अहमदपूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.गणेश कदम, चाकूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष विलास पाटील चाकूरकर, एन.आर.पाटील, चंद्रकांत मद्दे, निलेश देशमुख, नीलकंठ मिरकले, अनिल चव्हाण, पप्पू भाई शेख आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, चाकूर हे काँग्रेसचे मूळ आहे चाकूरने आम्हाला नेहमीच प्रेरणा दिली आहे. काँग्रेसचा विचार नेहमीच तेवत ठेवण्याचे काम चाकुरने केले आहे. देशात लोकसभेची निवडणूक ही एनडीए विरुद्ध इंडिया होत आहे. तर राज्यात महाविकास आघाडी (पान ७ वर)

# सामाजिक सलोखा, शांतता कायम ठेवून जयंती सण साजरे करा



लातूर / प्रतिनिधी- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतीराव फुले जयंती, श्रीराम नवमी आणि रमजान ईद आदी सण, जयंती उत्सव जिल्ह्यात साजरे होणार आहेत. सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांच्या भावनांचा आदर करीत हे जयंती, सण साजरे करावेत. या काळात सामाजिक सलोखा, शांतता कायम राखून लातूर जिल्ह्याची परंपरा जोपासावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतीराव फुले जयंती, श्रीराम नवमी आणि रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित सर्व समाज प्रतिनिधी, जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी यांचा समावेश असलेल्या शांतता समितीच्या बैठकीत श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्यासह भंते भिक्खु पय्यानंद थेरो, विविध समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात सर्व जाती-धर्मीय बांधव एकत्र येवून सण, उत्सव साजरे करतात, ही आजपर्यंतची परंपरा आहे. त्यामुळे आजपर्यंत जिल्ह्यातील सामाजिक सलोखा आणि शांतता टिकून असून हीच परंपरा कायम राखणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळात साजरे होणारे सण, जयंती उत्सव काळात सर्वांनी नियमांचे पालन करून आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करून उत्साही वातावरणात साजरे करावेत. यानिमित्ताने आयोजित मिरवणूक, शोभायात्रेत कोणताही अनुचित प्रकार घडू नयेत, याबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

सण, जयंती उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. सर्वांनी कायद्याचे आणि आदर्श आचारसंहितेचे पालन करून सण, उत्सव साजरे करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले. तसेच जिल्ह्यात शांततामय वातावरणात सण, उत्सव साजरे व्हावेत, यासाठी पोलीस प्रशासनामार्फत उपाययोजना हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सण, जयंती उत्सव काळातील मिरवणुका, (पान ७ वर)

# पुणे जिल्हा कलाशिक्षक संघाच्या वतीने महादेव खळुरे यांचा गौरव




अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) पुणे जिल्हा कलाशिक्षक संघाच्या वतीने महादेव खळुरे यांचा गौरव करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, पुणे जिल्हा कलाशिक्षक संघ पुण्याच्या वतीने घेण्यात आलेल्या एकदिवसीय जिल्हास्तरीय कलाशिक्षक कृतीसत्र कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या राज्याचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्या हस्ते यशवंत विद्यालय अहमदपूर येथील क्रांतीज्योती सावित्रीमाई राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त कलाशिक्षक महादेव खळुरे यांचा गौरव करण्यात आला.

कलाक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल तसेच आकाशवाणी, स्वीप जनजागृती, तंबाखूमुक्त शाळा अभियान, इंधन संवर्धन यासारख्या अनेक राष्ट्रीय व सामाजिक कार्यात विशेष योगदान दिल्याबद्दल महादेव खळुरे यांचा दि.३ एप्रिल रोजी डी.वाय.पाटील सभागृह, प्राधिकरण,आकुर्डी येथे राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी,सुप्रसिद्ध जेष्ठ अभिनेत्री पद्मश्री नयना आपटे,डी.वाय. पाटील कला महाविद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कलवले, प्रो.शंकर आडेराव,डॉ.वराहूल वेलदोडे,प्रो.पल्लवी पांढरे ,डॉ. नितीन तावरे, पुणे जिल्हा कलाशिक्षक संघ संस्थापक हुसेन खान, राज्य उपाध्यक्ष किरण सरोदे , अध्यक्ष मिलिंदा शेलार यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा संपन्न झाला.

सदरील यशाबद्दल सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार शिवाजी पालेपाड, लातूर बोर्डाचे सचिव सुधाकर तेलंग, डायटचे प्राचार्य डॉ भगिरथी गिरी, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव शिक्षण महर्षि, दलित मित्र डी.बी.लोहारे गुरुजी, प्राचार्य गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे, उपप्राचार्य सय्यद एम. यू., पर्यवेक्षक आशोक पेद्देवाड, रामलिंग तत्तापुरे, कलाध्यापक दिपक जगताप, श्रीमती भारती भगत यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंद केले आहे.

# अनुसूचित जातीचे बोगस प्रमाणपत्र जोडून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी नायब तहसीलदार मधुकर क्षीरसागर यांचेवर कार्यवाही न केल्याने व्यथित होवून मनोहर पाटील यांचा आत्मदहनाचा संकल्प

लातुर दि.०४ (प्रतिनिधी) अनुसूचित जातीचे बोगस प्रमाणपत्र जोडून अनुसूचित जाती जमाती अन्याय प्रतिबंधक अधिनियमाचा अवमान करुन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी नायब तहसीलदार मधुकर क्षीरसागर यांचेवर कार्यवाही न केल्याने व्यथित होवून आत्मदहन करण्याचा संकल्प एका निवेदनाव्दारे मनोहर माणिकराव पाटील यांनी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त, क्रीडामंत्री, सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे केला आहे.


निवेदनात असे म्हटले आहे की, मी अर्जदार मनोहर माणिकराव पाटील रा. अहमदपूर यांनी दि. ०७/०३/२०२४ रोजी आपल्या कार्यालयाकडे नायब तहसीलदार क्षीरसागर हे मराठा ओपन समाजाचे असताना त्यांनी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कलमाचे उल्लंघन करुन शासनास स्वतः अनुसूचित जाती जमातीचे असल्याचे खोटे कागदपत्र सादर करुन आपल्या कार्यालयातील अधिकाऱ्याशी संगनमत करुन बेकायदेशीर पदोन्नती घेतली आहे.

त्यांचे विरुद्ध तात्काळ कार्यवाही करावी वगेरे मजकूराच्या माझ्या तक्रारीवर आजपर्यँत प्रशासनाने कुठलीही कार्यवाही केलेली नाही. सदर नायब तहसीलदार यांनी अनुसूचित जाती जमाती अन्याय प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन केल्याने व शासनाची फसवणूक केल्याने त्याचे विरुद्ध कलम ४२० भा. द. वि., अट्रासिटी कायद्याप्रमाणें तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध पण योग्य तीं कायदेशीर कारवाई कराबी. .

ज्या अर्थी आदर्श आचार संहिता निबड़णूक आयोग महाराष्ट्र राज्य यांच्या पारदर्शक तत्वानुसार कुठलाही वर्ग-२ श्रेणीतील कर्मचारी त्यांच्या मुळ तालुक्यात निवडणूकीत सेवा देवू शकत नाही त्या अर्थी नायब तहसीलदार मधुकर क्षीरसागर यांचे मुठ गाव अंधोरी ता.अहमदपूर हे असताना आचारसंहितेच्या काळात त्यांची बदली अहमदपूर येथे करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांचे येथील काँग्रेस पक्षाचे प्रदाधिकाऱ्यांशी जबळीकता असल्याने व निवडणूकीच्या काळात ते, हेराफेरी करण्याची शक्यता असल्याने त्यांची बदली इतर जिल्ह्यात करण्यात यावी. ही मागणी करुनसुद्धा आजपर्यत कारवाई न झाल्याने मी व्यथित होवून दि.२५/०४/२०२४ रोजी आत्मदहन करण्याचा संकल्प निवेदनाव्दारे केला आहे.

सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आल्या आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या
## जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन



अहमदपूर दि.०४ (कारामुंगीकर) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचया जयंती निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सम्राट मित्र मंडळ आणि बौध्द नगर मित्रपरिवार च्या वतीने भारतरत्न, बोधिसत्व, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी भव्य रक्तदान शिबिराचं आयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या समोर,अहमदपूर जि.लातूर येथे दि. ०८.०४.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले आहे. सदरील रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करावे असे आवाहन सम्राट मित्र मंडळ आणि बौध्द नगर मित्रपरिवार च्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रा. डॉ. सखाराम वाघमारे यांची भूगोल अभ्यास मंडळावर निमंत्रित सदस्य म्हणून निवड




अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) प्रा. डॉ. सखाराम वाघमारे यांची भूगोल अभ्यास मंडळावर निमंत्रित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाची विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले सभागृह बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते वसुंधरा महाविद्यालय घाटनांदूर येथील भूगोल विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ. सखाराम वाघमारे अंधोरीकर यांची भूगोल अभ्यास मंडळावर निमंत्रित सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

प्रा. डॉ. सखाराम वाघमारे यांनी महाराष्ट्राचा औद्योगिक भूगोल, आपत्ती व्यवस्थापन भूगोल, नैसर्गिक आपत्तीचा भूगोल, हवामान बदलाचा कृषी वरील परिणाम, हवामान बदल आणि महाराष्ट्रातील कृषी समस्या, गुरु रविदास : जीवन आणि कार्य या विविध पुस्तकाचे लेखन व संपादन केले आहे. तीन वेळा भूगोलावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन ही केले होते. त्यांचे आतापर्यंत ३० पेक्षा जास्त शोध निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरून विविध जर्नल मधुन प्रसिद्ध झाले आहेत. राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती व राष्ट्रीय दिन विशेष निमित्त त्यांचे लेख ही विविध वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत. जैवविविधतेचे संवर्धन व त्याचा शाश्वत वापर आणि स्वच्छ व सुंदर भारतासाठी मी काय करू शकतो या त्यांच्या दोन लघुशोध निबंधांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कारही मिळाले आहेत. या शिवाय सरांना विविध संस्थांकडून राज्य व राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सर सध्या महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष म्हणून ही काम करत आहेत. सरांनी पर्यावरण संवर्धन व संतुलन, पाणी बचत या विषयावर लेखन व व्याख्यान दिली आहेत. प्रा. डॉ. सखाराम वाघमारे यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाने त्यांची नुकतीच विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळावर निमंत्रित सदस्य म्हणून निवड केली आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. बालासाहेब देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा संस्थेचे सचिव मा. गोविंदराव देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरूण दळवे, भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. ए. आय. खान, माजी अध्यक्ष प्रोफेसर दादासाहेब गजहंस, विद्यापीठ भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. मदन सुर्यवंशी, उपप्राचार्य प्रा. डॉ. अर्जुन मोरे, प्रा. डॉ. मनिषा देशमुख, अंधोरी चे माजी सरपंच मा. सत्यभूषण क्षिरसागर, धनंजय उजनकर, नागनाथ माने, मनोज कांडणगिरे, प्रा. डॉ. जगन्नाथ तुडमे, प्रा. डॉ. अमोल गंगणे, प्रा. डॉ. संजय खाडप, प्रा. नरसिंग उदार, प्रा. डॉ. बायजा कोटुळे, प्रा. डॉ. मकरंद जोगदंड, प्रा. डॉ. गजानन सवने, मनोज कांडणगिरे, प्रा. डॉ. गोविंद झाडके व प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, अहमदपूर यांचे कार्यालयात**

**जन्म-२/जन्म/मृत्यु विभाग**

**मृत्यू नोंदनी प्रमाणपत्र जाहीरनामा**

जा.क्र २०२४/दंडनीय/कावि दि. ०४.०३.२०२४

विषय : जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणीचे आदेश होणे बाबत.

**जाहीरप्रगटन**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **विद्या विवेक कनकदंडे** रा. भाग्य नगर, अहमदपूर, ता. अहमदपूर जि. लातूर यांनी कलम १३/३ अन्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा अंतर्गत अर्जदार यांची आजी नाव अर्जदार **रमाबाई नागरोराव रोपळेकर** यांचा मृत्यू दि. १६/१२/२००९ रोजी मौ. परचंडा, ता. अहमदपूर येथे राहत्या घरी झाला असल्याने त्यांच्या मृत्यू तारखेची नोंदणी ग्राम पंचायत कार्यालय, परचंडा, ता. अहमदपूर जि. लातूर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठलाही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादन न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये ग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

सही/-
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार, अहमदपूर**

सदरचे जाहीर प्रगटन हे आज दि. ०४/०३/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

प्रत : १. ग्राम पंचायत कार्यालय, परचंडा,ता. अहमदपूर जि. लातूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे प्रगटन नोटिस बोर्ड वर डकवुन पंचनामा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी. अहवाल मुदतीत प्राप्त न झाल्यास आपली काहीही हरकत नाही असे समजुन नियमानुसार पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल.

२. अर्जदार **विद्या विवेक कनकदंडे,** रा. भाग्य नगर, अहमदपूर, ता. अहमदपूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरच्या जाहीर प्रगटनास दैनिक वृत्तपत्रामध्ये स्वखर्चाने प्रसिद्धी देवून वृत्तपत्र या कार्यालयास सादर करावे.

शिक्का

सही/-
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार, अहमदपूर**

# ज्ञानदीप अकॅडमीचा १२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा




अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) ज्ञानदीप अकॅडमी अहमदपूर चा आज १२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानदीप अकॅडमी अहमदपूर चे संचालक उधव इप्पर होते तर प्रमुख मार्गदर्शक अहमदपूरचे कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष कल्याणकर, उपस्थित होते.

ज्ञानदीप अकॅडमी चा आज १२ वा वर्धापन दिन या निमित्तानं यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. नुकतेच प्रशिक्षण पूर्ण करून आलेले अकॅडमी चे विद्यार्थी विशाल इप्पर, ज्ञानेश्वर डोम्पले, विष्णू मुंडे यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते करण्यात आला.

अकॅडमी चे संचालक इप्पर यांनी प्रास्ताविक केले त्यामध्ये बोलताना म्हणाले की अकॅडमी ची स्थापना अकॅडमी चे मुख्य मार्गदर्शक मंचक इप्पर, आयपीएस (डी आय जी) ४ एप्रिल २०१२ रोजी सुरुवात यांच्या मार्गदर्शनातून झाली. फक्त २ विद्यार्थी पासून सुरुवात झालेली अकॅडमी वर्षाला हजारो विद्यार्थी प्रवेश घेतात व यशस्वी होतात. आतापर्यंत हजारो विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थी स्वतःची मेहनत, ग्राउंड व लेखी तयारी करून घेणारे शिक्षक, अकॅडमी ची शिस्त, यामुळे मोठ्या प्रमाणत विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थी आपल्या मनोगतात म्हणाले की ज्ञानदीप अकॅडमी ही गोर गरीब व होतकरू विद्यार्थी साठी अतिषयं चांगली आणि सेफ आहे. येथे कमजोर विद्यार्थ्यांना घडवले जाते फक्त सातत्य ठेवणे गरजेचे आहे. म्हणूनच आमच्या सारखे सर्व सामान्य घरचे विद्यार्थी यशस्वी झालो आहोत.

मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलिस अधिकारी कल्याणकर म्हणाले की, आपण सर्व जण ग्रामीण भागातील आहेत ग्राउंड आऊट ऑफ आले पाहिजे आणि लेखी ची पण चांगली तयारी करा तुम्ही सर्व जण यशस्वी होतात. अभ्यास करतेवेळी स्वतःच्या नोट्स काढा, न्युज पेपर ची कात्रण काढा, दररोज च्या चालू घडामोडी लिहून ठेवा. मन लावून अभ्यास करा . शोले स्टाईल मध्ये अभ्यास करा, म्हणजे जसे आपण एखादा सिनेमा मन लावून पाहतो तो पूर्ण लक्षात राहतो मग अभ्यास का राहत नाही. त्यासाठी अभ्यास सुधा मन लावून करा तुम्ही या भरती मध्ये नक्कीच यशस्वी व्हाल. या पोलिस भरती नंतर मी स्वतः तुमचा सत्कार करण्यासाठी येईल.

अकॅडमी चे आधार स्तंभ आमचे वरिष्ठ श्री मंचक इप्पर आयपीएस हे तुमच्या साठी आयडॉल आहेत कारण त्यांनी एका शेतकरी व गरीब कुटुंबामध्ये येवढे मोठे यश मिळवले आहे तर तुम्ही का नाही मिळवू शकत नाही.

ज्ञानदीप अकॅडमी ही सर्वांना घेऊन चालणारी अकॅडमी आहे. गणपती वेळी, जयंती वेळी पोलीस प्रशासनाला मदत करते, सामाजिक बांधिलकी सांभाळून चालवली जाणारी अकॅडमी म्हणजे ज्ञानदीप अकॅडमी.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अमोल वाघमारे तर आभार प्रदर्शन नितीन गुट्टे यांनी केले.

सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्राउंड प्रशिक्षक राम मेजर जितेंद्र मेजर महिला प्रशिक्षक अर्चना करपे, चांदणी कुजूर व संदिप नरवटे यांनी सहकार्य केले. तसेच यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

## बचत गटाची सुरुवात

ताई बाई अक्का
मीना रमा शालू
झालं का ग तुझं
गटाच खात चालू....
बचत करता करता
पै पै करतो जमा
बघीतले बुकात तर
डोळे पाणावले ना !!!
संसाराची गाडी ओढण
वाटत का सोप ??
थोडी थोडी बचत
बनते बघा ठोक ...
बचत होता जमा
अधिकारी येती दारी
पुढील उद्योगासाठी
करु बॅकेची थोडी उधारी....
हप्ता भरु परतीचा
फेडु सारे या ग या
छोटासा उद्योग करीत
आनंदाने जगु या ....



वाघमारे उषा,
ग्रामीण लेखिका, लातूर.

## कबीरवाणी

अपानपौ न सराहिये,
और न काहीये रंक
ना जानो किस बिरख
तली, कुडा होई करंक

**भावार्थ** : संत कबीर म्हणतात कि, मानव हा स्वतःचे बडप्पन व खोटी स्तुती यामध्ये स्वतःला धन्य समजत असतो, खुश होत असतो, मात्र स्वतःची खोटी स्तुती करून अहंकार करणे आणि इतरांना तुच्छ समजणे या दोन्ही गोष्टी खोट्या अभिमानाची चिन्हे आहेत. आणि या खोट्या अभिमानामध्ये मानव जीवनभर जगत असतो.

यामुळे तो हे शरीर नाशवंत आणि तुच्छ आहे हे विसरुन जातो आणि अहंकारी जीवन जगतो. मात्र हे शरीर हाडांचा ढीग बनून कोणत्या उकिरड्यावर टाकले जाईल हे अज्ञान आणि माया यांमध्ये गुरफटलेल्या माणसाला माहीतच नसते.

डॉ. बालाजी कारामुंगीकर
मो . ९८२३११२९०७

यशवंत धाराशिव जिल्हा
शुक्रवार दि. ०५ एप्रिल २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## आर्मीमध्ये सेवा बजावणाऱ्या जवानाच्या घराचे कुलूप तोडून साहित्याची चोरी

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – कोलकत्ता येथे आर्मीमध्ये कर्तव्यावर असलेल्या जवानाच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी साहित्याची चोरी केली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, धाराशिव तालुक्यातील अंबेजवळगे येथील महादेव बाळू नन्नवरे (वय ३४ वर्षे) यांचा मित्र आनंद क्षिरसागर कोलकत्ता येथे आर्मीमध्ये नोकरीस असून त्यांच्या घराच्या देखभालीचे व साफसफाईचे काम महादेव नन्नवरे हे करत आहेत. मात्र आनंद क्षिरसागर यांच्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि. ३ एप्रिल रोजी रात्री १२.३० ते सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास तोडून आत प्रवेश करुन घरातील टी.व्ही., होम थेटर, व्हीवो कंपनीचा मोबाईल, रोख रक्कम ५० हजार रुपये असा एकूण ६८ हजार रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. या प्रकरणी महादेव नन्नवरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात ४५७, ३८० भा.दं. वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# राष्ट्रवादीला लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल पदाधिकाऱ्यांचा जल्लोष

## छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आनंदोत्सव





धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा निवडणूकची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये दि.४ एप्रिल रोजी जल्लोष करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

उस्मानाबाद लोकसभेसाठी महायुतीच्यावतीने गेल्या अनेक दिवसांपासून उमेदवार निश्चित करण्यात चालढकल करण्यात येत होती. मात्र भारतीय जनता पार्टीच्या नेत्या अर्चनाताई पाटील यांनी मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश कार्यालयामध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. पक्ष प्रवेशानंतर अध्यक्ष पवार व प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी पक्षाच्या उमेदवारीची माळ अधिकृतपणे अर्चनाताई पाटील यांच्या गळ्यात टाकली. मुंबईत उमेदवारीची अधिकृत घोषणा झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतीतील घटक पक्षाच्याच्यावतीने धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये फटाक्याची आतिषबाजी करीत पदाधिकाऱ्यांना पेढे भरविण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष समियोद्दिन मशायक, धाराशिव शहराध्यक्ष सचिन तावडे, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, युवक जिल्हा कार्याध्यक्ष मनोज जगताप, महिला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण, धाराशिव शहर कार्याध्यक्ष मनोज मुदगल, अकबर खान पठाण, धाराशिव युवक शहराध्यक्ष निहाल शेख, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष असदखान पठाण, सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष सतीश घोडेराव, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, आदिवासी सेलचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब पवार, विद्यार्थी जिल्हा कार्याध्यक्ष प्रतीक माने, धाराशिव युवक जिल्हा उपाध्यक्ष आशिष पाटील, धाराशिव युवक शहर कार्याध्यक्ष संदीप बनसोडे, युवक जिल्हा संघटक सुदर्शन करंजकर, अरफात काझी, धाराशिव महिला तालुका कार्याध्यक्ष रुक्मिणी कुंभार, सुरेखा चव्हाण, धाराशिव महिला तालुका उपाध्यक्ष उषा लगाडे ,धाराशिव महिला शहर उपाध्यक्ष हसीना पटेल, लैला शेख, लिंबराज लोखंडे, सुरेश राठोड, बाबासाहेब पवार, विनोद अवतारे, बालाजी जावळे, सुहास मेटे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, भाजप महिला जिल्हाध्यक्ष नंदाताई पनगुडे, राहुल काकडे, विलास सांजेकर, शेषेराव उंबरे, पांडुरंग लाटे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भा.ज.प, शिवसेना व महायुतीतील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुळेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

ढोकी दि.४ (प्रतिनिधी) – धाराशिव तालुक्यातील मुळेवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने श्रीराम नवमी व श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह तथा श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांसह नागरिकांनी या सप्ताह सोहळ्यातील कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मुळेवाडी ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

धाराशिव तालुक्यातील मुळेवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने प्रति वर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १६ ते २३ मे या कालावधीत श्रीराम नवमी व श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह तथा श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यानिमित्त दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांसह श्रीमद् भागवत प्रवक्ते हभप भागवताचार्य नितीन महाराज जगताप हिप्परगेकर यांच्या मधूर वाणीतून भागवत कथेचे निरुपणा बरोबरच राज्यभरातील नामवंत कीर्तनकाराची कीर्तनसेवा संपन्न होणार आहे तसेच सकाळी अल्पोपहार दुपारी व संध्याकाळी उपस्थित भाविक भक्तांसह नागरिकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे त्याचबरोबर सप्ताह कालावधीत हभप रोहिदास महाराज मस्के , ह भ प भाऊसाहेब महाराज घाटणेकर , ह भ प महादेव महाराज बोराडे , ह भ प विलास महाराज गेजगे , ह भ प ज्ञानेश्वर महाराज कोठुळे , ह भ प भारत महाराज शिंदे , ह भ प गणेश महाराज भगत , आदि नामवंत कीर्तनकाराची कीर्तन सेवा संपन्न होणार आहे तर दिनांक २३ मे रोजी ह भ प नितीन महाराज जगताप यांचे काल्याची कीर्तन सेवा संपन्न झाल्यानंतर उपस्थित भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटपाने सप्ताह सोहळ्याची सांगता करण्यात येणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सप्ताह सोहळ्यातील कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुळेवाडी ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

## वागदरी येथे श्री संत सदगुरू भवानसिंग महाराज यात्रा उत्साहात साजरी

नळदुर्ग दि.४ (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यातिल वारकरी सांप्रदायाचा वारसा जोपासणारे गाव म्हणून ओळख असलेल्या वागदरी येथे श्री संत सद्गुरू भवानसिंग महाराज मंदिर यात्रा मोठ्या उत्साहात व विविध धार्मिक कार्यक्रमांनी पार पडली.

श्री सद्गुरू संत भवानसिंग महाराज यांच्यामुळेच वागदरी गावाला वारकरी सांप्रदायाचा वारसा लाभलेला असून दर वर्षी श्री संत भवानसिंग महाराज भजनी मंडळ, यात्रा कमिटी व समस्त ग्रामस्थांच्यावतीने ग्राम दैवत श्री सद्गुरू संत भवानसिंग महाराज यांची यात्रा भरवली जाते. याही वर्षी दि. ३१ मार्च व १ एप्रिल अशी दोन दिवसीय यात्रा भरविण्यात आली होती. यात्रेनिमित्त दि.३१ मार्च रोजी अक्कलकोट तालुक्यातील चुंगी येथून प्रतिवर्षा प्रमाने सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास श्री संत भवानसिंग महाराज यांच्या पालकीचे आगमन वागदरी गावात झाले. गावातील मुख्य रस्त्यावरून टाळ मृदंगाच्या गजरात पालकीची मिरवणूक काढण्यात आली. रात्रभर चक्री भजन, प्रवचण, हरी जागर, किर्तन आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर दि.१ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजल्यापासून विविध गावातून आलेल्या टाळकरी दिंडीच्या पाऊलाचे (खेळाचे) सादरीकरण व अभंग गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. तसेच दुपारी



२.३० वा दरम्यान लाही फोडून यात्रा महोत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी वागदरी, नळदुर्ग, शहापूर, गुजनूर, दहीटणा, खुदावाडी, लोहगाव, नंदगाव, होर्टी, मुर्टा, चिकुंद्रा, किलज, सराटी येथील भाविक भक्तांनी श्री संत भवानसिंग महाराज व श्री संत चोखाबा महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

## नवोदय विद्यालयाचा वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर




तुळजापूर दि.४ (प्रतिनिधी) – केंद्र सरकारच्या अधिनस्थ मानव विकास संसाधन मंत्रालय, नई दिल्ली द्वारा चालवत असलेल्या पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालया तुळजापूर शैक्षणिक सत्र २०२३–२४ चा वार्षिक परीक्षेचा निकाल १ एप्रिल रोजी सहावी, सातवी, आठवी, नववी व अकरावी वर्गाचा निकाल जाहीर झाला. यामध्ये सहावी वर्ग– प्रथम क्रमांक सिद्धी खरडकर ९५.८३ द्वितीय –अंकिता कांबळे ९५.४२ तृतीय प्राची कुडकले ९४.८३, सातवी प्रथम आकाशी करंडे ९७.५, ओमराजे चव्हाण व स्वराज तांबारे द्वितीय ९६.८८, तृतीय प्रियंका पोळ ९६.२५, वर्ग आठवी प्रथम रणवीर भातलवंडे ९६.४०, द्वितीय समर्थ मोटे ९५.७, तृतीय अथर्व सुतार व संजना चौगुले ९५, नववी प्रज्वल नरहरे ९८.३, द्वितीय सुप्रिया शिंदे ९७.३, तृतीय अनुष्का चौगुले ९४.२, अकरावी प्रथम क्रमांक आदेश कातुरे ८६.२ द्वितीय क्रमांक प्राजक्ता सरडे ८४.४ या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य श्री गंगाराम सिंह यांनी अभिनंदन केले. तर नवीन शैक्षणिक वर्ष २०२४–२५ चा १ एप्रिलपासून प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्राचार्य गंगाराम सिंह, विद्यालयाचे वरिष्ठ अध्यापक सचिन खोब्रागडे, हरी जाधव सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या निकालासाठी परीक्षा विभागातर्फे परीक्षा प्रभारी वैभव कुलकर्णी, भगवंत गवले, यश पाटील यांनी विशेष पुढाकार घेतला होता.

## भिडेवाडा बोलला कविता स्पर्धेत मुळे यांना तृतीय पारितोषिक

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – कवी विजय वडवेराव आयोजित... भिडेवाडा बोलला...या आंतरराष्ट्रीय काव्य लेखन स्पर्धेत धाराशिव येथील प्रा माया मुळे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात भिडे वाडा बोलला या काव्य लेखन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.


या स्पर्धेत ६०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्त्री शिक्षणाची बीजे ज्या ठिकाणी पेरली गेली त्या भिडे वाड्याचे ऐतिहासिक महत्त्व सर्वांना माहिती व्हावे तसेच पुढील पिढ्यांपर्यंत हा इतिहास पोहचावा या उद्देशाने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक, शाल, पुस्तक व रोख रक्कम असे होते. यामध्ये सोलापूर येथील डॉ कविता मुरुमकर यांनी प्रथम तर सांगलीच्या डॉ वैशाली शेंडगे यांनी द्वितीय क्रमांक यांनी पटकाविला. तसेच उत्तेजनार्थ कवी प्रभाकर दुर्गे, स्नेहल पाटील, मीनाक्षी जगताप, मनीषा पाटील, अनुपमा नाईक, आनंद ढाले, धनश्री ठाकरे, आनंद भोसले, क्षमा सावंत, मनोज भारशंकर, डॉ. स्नेहल कुलकर्णी, प्रणाली मराठे, वंदना केंद्रे, पल्लवी उमरे, वृषल चव्हाण यांचा सन्मान



करण्यात आला. त्याबरोबरच भिडेवाडा मुक्ती चळवळीत योगदान असणाऱ्या दादासाहेब सोनवणे व अहिल्याबाई कांबळे यांचा देखील सन्मान करण्यात आला. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, कवी म.भा. चव्हाण, भारती विद्यापीठाच्या शालेय शिक्षण विभागाचे संचालक एम.डी. कदम आदी उस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल पोटे व सुरत गुजरात यांनी केले. याबद्दल मुळे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


# अखेरच्या क्षणी दीर विरुद्ध भावजय समोरासमोर

## खा. राजेनिंबाळकर विरोधात माजी जिल्हा परिषद उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी दंड थोपटले



धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा निवडणुकीसाठी महाआघाडीकडून विद्यमान खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. मात्र महायुतीकडून उमेदवार देण्यास अनेक इच्छूक असलेल्यांची चाचपणी केली जात होती. मात्र दि.४ एप्रिल रोजी पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या व सध्या भारतीय जनता पार्टीत सामील झालेल्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) गटाने उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे या निवडणुकीत दीर विरुद्ध भावजय असाच सामना रंगणार आहे.

उस्मानाबाद लोकसभा मतदार संघासाठी महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यापैकी कोणत्या पक्षाला जागा सोडायची ? यावरुन बरेच दिवस चर्चे चे गुऱ्हाळ सुरू होते. तर निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसंवाद यात्रे दरम्यान खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना महाविकास आघाडीच्यावतीने जाहीर सभेत उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे त्यांनी मतदार संघांमध्ये प्रचार यंत्रणा देखील राबविली आहे. मात्र महायुतीचा उमेदवार कोण ? हे आजपर्यंत निश्चित ठरत नसल्यामुळे इच्छुकांमध्ये प्रचंड संभ्रमावस्था निर्माण झाली होती. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रदेश उपाध्यक्ष प्रा सुरेश बिराजदार, शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे तर भाजपाकडून आमदार राणाजगजितसिंह पाटील, बसवराज मंगरुळे, नितीन काळे, रामदास कोळगे, ॲड व्यंकटराव गुंड, खंडेराव चौरे, अर्चनाताई पाटील, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य तसेच शिवसेनेकडून आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत, धनंजय सावंत, माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्यासह इतरांच्या नावांचा उमेदवारीमध्ये समावेश होता. मात्र ही जागा कोणत्या पक्षाला सोडायची आहे किंवा सोडली आहे ? याचा पदाधिकाऱ्यांना अजिबातच थांगपत्ता नव्हता. त्यामुळे दररोज या जागेवरून वेगवेगळ्या नेत्यांची नावे चर्चेत असायची. मात्र ४ एप्रिल रोजी पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या, लेडीज क्लबच्या अध्यक्षा व जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे




प्रमुख राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश दिला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांची लोकसभेसाठी अधिकृत उमेदवारी जाहीर केली. खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर व अर्चनाताई पाटील या नात्याने दिर भावजय आहेत. त्यामुळे या मतदार संघांमध्ये दीर विरुद्ध भावजय असा सामना रंगणार आहे.

## वाळू माफियांनी वाळूच्या पैशासाठी एकाचे अपहरण करुन चाकुने केले वार

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – वाळू माफियांनी वाळूच्या राहिलेल्या पैशासाठी एकाचे थेट अपहरण केले. तसेच त्यांनी त्याच्या दोन्ही हातावर, तोंडावर व पार्श्वभागावर चाकुने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे माफिया राजची गुंडगिरी कुठल्या थराला चाललेली आहे, याचा अंदाज सर्वसामान्यांना येऊ लागला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील केज येथील शिवशंकर इंगळे, संजय पवार व इंडिका व्हिस्टा गाडीचा डायव्हर यांनी दि.२८ मार्च रोजी ३ वाजण्याच्या सुमारास लोहारा तालुक्यातील मोघा खुर्द ते मोघा बु. गावच्या मध्यभागी असलेल्या लक्ष्मी मंदीराजवळ बाजीराव दिनकर भोंडवे (वय– ३० वर्षे) यांना नमुद आरोपींनी वाळूचे राहिलेल्या पैशाच्या कारणावरुन उचलून नेवून चाकूने दोन्ही हातावर, तोंडावर व पार्श्वभागावर वार करुन जखमी केले. तसेच लोहाटा गावाच्या बाहेर रस्त्याच्या बाजूला सोडून दिले. या प्रकरणी बाजीराव भोंडवे यांनी दि.३ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून लोहारा पोलीस ठाण्यात ३६३, ३६५, ३२४, ३२३, ३५ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# संपादकीय

## विनाशाच्या दिशेने

अफगाणिस्तान म्हणजे आपल्या सामरिक व्यूहरचनेसाठी राखीव भाग आहे, हा पाकिस्तानचा भ्रम होता. आता चीन त्याच दृष्टीने पाकिस्तानकडे पाहात असून आपल्या चुकांची मोठी किंमत पाकिस्तानला चुकवावी लागेल, असे दिसते.

पाकिस्तानातील खैबर पख्तुनख्वा प्रांतात दहशतवादी हल्ल्यात पाच चिनी अभियंत्यांचा मृत्यू झाला. याबद्दल चीनला उत्तर देताना पाकिस्तान सरकारची भंबेरी उडाली आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरिफ, गृह मंत्री मोहसीन नक्वी इस्लामाबादमधील चिनी दूतावासात जाऊन आले. याआधीही चिनी कर्मचारी दहशतवादी हल्ल्यांमध्ये बळी पडले आहेत. त्या - त्या वेळी पाकिस्तानकडून सुरक्षेची ग्वाही दिली गेली, अर्थातच ती कागदोपत्री राहिली. याचे कारण तेथील अराजक. पाकिस्तानपासून स्वतंत्र होण्यासाठी बलुचिस्तानात सशस्त्र संघर्ष सुरु आहे. वर्षानुवर्षे पाकिस्तानात राहात असलेल्या मूळच्या अफगाण नागरिकांना मायदेशी पाठविण्यावरुन पाकिस्तान-अफगाणिस्तान यांच्यात संघर्ष भडकला आहे. लष्कराच्या आशीर्वादाने कथित लोकशाही मार्गाने आलेले शरिफ यांचे सरकार निष्प्रभ आहे आणि सत्तेची सूत्रे हातात असून देखील दहशतवादी कारवाया रोखण्यात लष्कराला यश येत नाही. भारतविरोध आणि भारताच्या हितसंबंधांना हानी पोहोचविणे, हे चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचे समान उद्दिष्ट. साहजिकच आर्थिक विकास महामार्ग हा चीनचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पाकिस्तानसाठी मोठी संधी ठरली. देशाच्या विकासापेक्षा स्वतःची आर्थिक समृद्धी, हेच प्राधान्य असल्याने पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी ती सुवर्णसंधी साधली. सार्वभौमत्वाची चाड नाही, हे पाकिस्तानने अनेकदा सिद्ध केले आहे. कर्जाच्या ओझ्याखाली विविध देशांना अंकित करून घेणे ही चीनची व्यूहरचना असते. आज चीनकडून घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली पाकिस्तान दबला आहे. धरणांसह विविध प्रकल्पांवर चिनी अभियंते, तंत्रज्ञ काम करीत असून पाकिस्तान सरकारच्या विरोधातील सर्व दहशतवादी गटांचे ते लक्ष्य ठरले आहेत. आमच्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कोणती पावले उचललीत?' असे चीनने पाकिस्तानला खडसावून विचारले.


**चिनी लष्कराला प्रवेश?**

याही पुढे जाऊन, दहशतवादाचा एकत्रित मुकाबला करण्यासाठी चीनने पाकिस्तान सरकारला प्रस्ताव दिला आहे. चिनी लष्कराला पाकिस्तानसोबत काम करण्याची इच्छा आहे, दहशतवादासह विविध धोके आणि आव्हानांचा सामना करण्यााठी एकत्र काम करू आणि प्रादेशिक शांतता, स्थैर्य याचे रक्षण करू', असे चीनने थेट शब्दांमध्ये सांगितले. याचा अर्थ पाकिस्तानच्या भूमीवर चिनी लष्कराला प्रवेश हवा आहे! अमेरिकेच्या दृष्टीने अफगाणिस्तान आणि अन्य संदर्भात पाकिस्तानची गरज कधीही संपणारी नाही. चीनच्या विस्तारवादाला पायबंद घालण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या अमेरिकेसाठी पाकिस्तानी भूमीवर चिनी लष्कर, हे रुचणारे नाही. आतापर्यंत तरी पाकिस्तानने एकाचवेळी अमेरिका अणि चीन यांच्याशी मैत्रीचे नाटक उत्तम वठविले असले तरी यापुढे त्यात यश मिळेलच असे नाही. याशिवाय अफगाणिस्तानातील तालिबान सरकारमुळे पाकिस्तानच्या कोंडीत भर पडली. तेहरिक ए तालिबान पाकिस्तान हा पाकिस्ताननिर्मित भस्मासूर. या संघटनेला आता अफगाणिस्तानची सहानुभूती आहे. अफगाण सरकारच्या मदतीमुळे टीपीपी आमच्या लष्करी चौक्या, वाहने यावर हल्ला करते, असा पाकिस्तानचा आरोप आहे. पाकिस्तानमध्ये बलुचिस्तान हा आकारानुसार सर्वात मोठा प्रांत. विपुल खनिज संपत्तीमुळे सत्ताकारणात कायम वरचष्मा असलेल्या पंजाबी राजकारण्यांनी बलुचिस्तानचे शोषण केले. बलुचिस्तानात चिनी उपक्रमांना स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध आहे. आधी पंजाबी राज्यकर्ते जी भूमिका बजावत होते तीच आता चीनकडून केली जात आहे, अशी बलुचिस्तानमधील सामान्य नागरिकांची मानसिकता झाली असून चिनी कर्मचाऱ्यांवर सातत्याने हल्ले होण्याचे तेच कारण. परकीय कर्मचाऱ्यांच्या संरक्षणाच्या नावाखाली पाकिस्तान सरकार अथवा लष्कर यांच्याकडून बलुचिस्तानात बंडखोरांभोवती आणखी फास आवळला गेल्यास पाकिस्तानमधील अस्थिरतेत भर पडण्याशिवाय काहीही साध्य होणार नाही.

ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.

– संपादक **यशवंत** लातूर

## सर फ्रेड्रिक हॉपकिन्स ५९



रोगप्रतिबंधक जीवनसत्त्वांचा शोध लावून अखिल मानवावर उपकार करणाऱ्या सर फ्रेड्रिक हॉपकिन्स यांचा जन्म १८६१ साली इंग्लंडमध्ये झाला. त्याचे वडील त्याच्या लहानपणीच वारल्याने हॉपकिन्सचे शालेय शिक्षण म्हणजे अडथळ्यांची शर्यत होती. पैशाचे पाठबळ नसतानाही महाविद्यालयीन शिक्षण परिस्थितीवर मात करून त्याने पूर्ण केले. त्यासाठी काही काळ त्याला खाणशिक्षण संस्थेत, रसायनशास्त्र संस्थेत कामे करावी लागली. उरलेल्या वेळात अभ्यास करून रसायन व वैद्यक शास्त्रात उत्तमरीत्या पदवी प्राप्त करून केंब्रिज विद्यापीठात त्याने आपल्या संशोधनाचा पाया घातला. हॉपकिन्सच्या अंगची कर्तबगारी व संशोधनकार्यातील प्रगती पाहून सर विल्यम् डून यांनी सुरू केलेल्या आपल्या निधीतून अद्ययावत प्रयोगशाळा व प्राध्यापकीचा मान अशी दुहेरी देगणी त्याला बहाल केली. अशा तहेने प्रतिकूल परिस्थितीशी झगडत हॉपकिन्सने इंग्लंडमध्ये जीवरसायन शाखेची उभारणी करून जीवनसत्त्वांचा शोध लावला. त्याच्या तरुणपणी हा विषय मुळी स्वतंत्रपणे अस्तित्वातच नव्हता. एखाद्या प्राण्याला पुरविलेल्या अन्नात कार्बोहायड्रेट व चरबी या घटकाप्रमाणेच प्रथिनांनाही फार महत्त्व असते. ज्या वेळी प्रथिनांच्या घटकावर हॉपकिन्सचे संशोधन चालू होते, त्याकाळात प्रथिने निरनिराळ्या प्रकारच्या ॲमिनो आम्लापासून बनलेली असतात ही गोष्ट संशोधकांना माहीत होऊ लागली होती. एमिल् फिशर या संशोधकाने जर्मनीत, अशा अमिनो आम्लांचे स्वरूप स्पष्ट करून दाखविण्यास सुरुवात केली होती. प्रथिनातील ॲमिनो आम्ल या घटकात आणखी एका घटकाची भर टाकण्याचे काम त्या वेळेस हॉपकिन्सने आपल्या संशोधनातून केले. या नव्या घटकाला त्याने ट्रिप्टोफेन हे नाव दिले.१९०६ पर्यंत त्याने असे सिद्ध केले की केवळ पुरेसं प्रोटीन

मिळाल्यास प्राण्यांचे आरोग्य चांगले टिकून राहते असे नसून हे प्रोटीन-योग्य प्रकारचे व योग्य जातीचे असणे आवश्यक असते. हॉपकिन्सनेकेलेल्या संशोधनातून त्याला असे आढळून आले की केवळ शुद्ध

प्रथिने, चरबी व कार्बोहायड्रेट या तिघांच्या पुरवठ्यावर एखादा प्राणीजगून राहू शकत नाही. या तिघांप्रमाणेच त्या प्राण्याला आणखी एका

घटक द्रव्याची जरूरी असते. या चौथ्या व्हिटॅमिन किंवा जीवनसत्त्वे

या घटकावरील आपला संशोधन प्रबंध हॉपकिन्सने १९१२ साली 'इंद्रियविज्ञान' या नियतकालिकात प्रसिद्ध केला. त्यामुळे जीवनसत्त्वांची माहिती उजेडात येऊ शकली. ही व्हिटॅमिनची माहिती सर्वप्रथम जगाला करून

देण्याचा मान जरी हॉपकिन्सकडे जात नसला तरी प्राणीमात्राचे आरोग्य टिकविण्याच्या दृष्टीने या घटकाचे

महत्त्व आणि माहिती सर्वत्र पसरविण्यास हॉपकिन्सचे संशोधन कारणीभूत ठरले आहे. १९२९ साली हॉपकिन्सला देण्यात आलेले 'नोबेल' पारितोषिक तो आणि ख्रिश्चन आइकमन या दोघांना विभागून देण्यात आले. कारण आइकमननेही बेरीबेरी नावाचा रोग पॉलिश केलेल्या तांदळामुळे होतो, याचे कारण तांदळाच्या दाण्यावरील टरफलातही अत्यावश्यक जीवनसत्त्व असते याबद्दल संशोधन केले होते. मात्र हॉपकिन्सने व्हिटॅमिनच्या लावलेल्या शोधाबद्दल १९६१ साली ब्रिटनमध्ये त्याची जन्मशताब्दी साजरी करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## बीजिंग ऐवजी मुंबई अब्जाधीशांची राजधानी

भारताची आर्थिक राजधानी मुंबई आशियातील अब्जाधीशांची राजधानी बनली आहे. चीनची राजधानी बीजिंगला मागे टाकत मुंबईने प्रथमच हे स्थान मिळवले. येथे ६०३ चौरस किलोमीटर परिसरात ९२ अब्जाधीश राहतात, तर बीजिंगच्या १६ हजार चौरस किलोमीटर परिसरात ९१ अब्जाधीश आहेत. हुरुन रिसर्च'च्या २०२४ ग्लोबल रिच लिस्ट'नुसार गेल्या एका वर्षात २६ नवीन भारतीय अब्जाधीश झाले. बीजिंगमध्ये या कालावधीत १८ लोकांना या यादीतून वगळण्यात आले आहे. चीनमध्ये ८१४ अब्जाधीश आहेत, तर भारतात २७१ अब्जाधीश आहेत. जागतिक स्तरावर या यादीत मुंबई आता तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. न्यूयॉर्क पहिल्या स्थानावर आहे.

येथे ११९ अब्जाधीश राहतात, तर लंडन दुसऱ्या स्थानावर आहे, जिथे ९७ लोक अब्जाधीश आहेत. अब्जाधीश म्हणजे आठ हजार ३३३ कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती बाळगून असणारे लोक. अहवालानुसार, मुंबईतील एकूण ९२ लोकांची संपत्ती एका वर्षात ४७ टक्क्यांनी वाढून ४४५ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. त्याच वेळी चीनच्या राजधानीतील अब्जाधीशांची संपत्ती २८ टक्के कमी होऊन २६५ अब्ज डॉलर झाली आहे. एकीकडे भारत जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांच्या रांगेत जाऊन बसत असताना या देशातील अतिश्रीमंत अशा अब्जाधीशांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये हजारो कोटींची संपत्ती असलेल्या श्रीमंतांच्या संख्येत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली आहे. सध्या भारतात अशा अब्जाधीशांची संख्या १३०० पेक्षा जास्त झाली आहे. हुरुन इंडिया रिच लिस्टनुसार, सध्या भारतात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती असलेल्या लोकांची संख्या १,३१९ झाली आहे. श्रीमंत लोकांच्या या क्लबमध्ये २७८ नवे लोक सामील झाले आहेत.

भारताची अर्थव्यवस्था जगभरात घोडदौड करत असताना उद्योग क्षेत्र सकारात्मक आहे. हुरुन ग्लोबल'चे अध्यक्ष रुपर्ट हुगवर्फ म्हणतात की जगातील इतर देशांमधील उद्योगपतींपेक्षा भारतीय व्यावसायिक अधिक आत्मविश्वास बाळगून आहेत. चिनी व्यावसायिकांसाठी यंदाचे वर्ष वाईट जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. भारत आणि चीनमधील श्रीमंतांची तुलना करताना हुगवर्फ यांनी नमूद केले की दोन्ही देशांच्या श्रीमंतांच्या यादीत समाविष्ट असलेल्या लोकांमध्ये फरक आहे. भारतात कुटुंबांवर आधारित रचना आहे. या लोकांचे व्यवसाय पिढ्यानपिढ्या चालत आले आहेत. चीनमध्ये बहु-पिढीच्या बिझनेस हाऊसची कमतरता आहे. ते भारताची कुटुंब-आधारित रचना दुधारी तलवार मानतात. त्यांचा विश्वास आहे की, यातून परंपरा समृद्ध होत असली तरी नवनिर्मितीवर त्याचा परिणाम होतो. त्यांच्या मते आगामी काळात सर्वात श्रीमंत लोक दोन क्षेत्रांमधून उदयास येणार आहेत. पहिला सेक्टर एआय आणि दुसरा सेक्टर म्हणजे इलेक्ट्रिक वाहने. अलीकडच्या काळात अनेक कंपन्यांना एआयचा फायदा झाला आहे. त्यामुळे मायक्रोसॉफ्टचे मूल्यांकन सातशे ते आठशे अब्ज डॉलर्सनी वाढले आहे.



## थोर क्रांतिकारकाचा जाज्वल्य इतिहास





देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि त्याचे आपण देणे लागतो असे सावरकर म्हणत असत ते देणे चुकवण्यासाठी रणदीप हुडा यांनी काढलेला हू किल्ड हिज स्टोरी' या टॅगलाइनसह स्वातंत्र्यवीर सावरकर' हा मराठी चित्रपट सध्या प्रदर्शित होत आहे. त्याद्वारे सर्वांसाठी विशेषत: नवीन पिढीसमोर या महान क्रांतिकारकाचा धगधगता इतिहास उलगडून दाखवला आहे.

चित्रपटाच्या सुरुवातीलाच १८९६ च्या सुमारास देशात पसरलेली प्लेगची महामारी, त्यावेळी इंग्रजांनी भारतीयांवर केलेले अत्याचार दाखवले आहेत. प्लेग झालेल्या रुग्णास इंग्रज जिवंत जाळताना पाहूनच लहान विनायकाच्या मनात इंग्रजांविरुद्ध आत्यंतिक चीड निर्माण होते. त्यातूनच ते थोरल्या भावासह देशसेवेची शपथ घेतात आणि अभिनव भारत संघटनेची स्थापना करतात. या संघटनेच्या माध्यमातून युवकांना शस्त्रे चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात येते. या कामाबद्दल जहालवादी विचारसरणी असलेल्या लोकमान्य टिळकांना माहिती समजते. ते सावरकरांना कायद्याची माहिती व्हावी म्हणून लंडनला पाठवण्यासाठी साहाय्य करतात.

लंडनला गेल्यावरही ते मादाम बिकाजी कामा, मदनलाल धिंग्रा यांच्या समवेत अभिनव भारतची शाखा सुरू करतात. त्यांचे काही सहकारी इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या करतात. त्यामुळे सावरकरांना अंदमानात काळ्या पाण्याच्या शिक्षेवर पाठवण्यात येते.म. गांधीजींची अहिंसा आणि सावरकरांची सशस्त्र क्रांती या दोन विचारधारांची लढाई स्पष्ट करण्यावरच चित्रपटात भर दिलेला आहे. रणदीप हूडा सावरकरांची भूमिका अक्षरश: जगला आहे. चेहरेपट्टीत साम्य, त्यांच्या सारखी शरीरयष्टी दिसण्यासाठी त्याने प्रचंड मेहनत घेतलेली जाणवते. विशेषत: कोठडीत असताना किडलेले दात, फुटक्या चष्म्याआड मिचमिचणारे डोळे या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. सिनेमॅटोग्राफीद्वारे १९व्या शतकातील काळ उत्तम उभा केला आहे. अनेक ठिकाणी तत्कालीन फोटो, फिल्म जोडणे अपरिहार्यच आहे. चित्रपटाच्या अखेरचे रॅप साँग प्रभावी आहे.चित्रपटातील काही दृश्ये हृदयद्रावक आहेत. जहाजातून समुद्रात मारलेली उडी, कारागृहातील बंधुभेट, घरी आल्यावर भाजी-भाकरीचे साधेच जेवण जेवतानाचा प्रसंग, खुदीराम बोस, चापेकर बंधू इत्यादींना झालेली फाशी हे सर्व पाहताना डोळे पाणवल्याशिवाय राहात नाहीत. सावरकरांच्या पत्नी, यशोदाबाईंच्या भूमिकेत अंकिता लोखंडेने सुरेख अभिनय केलाय. तिला पडद्यावर फारसा वाव नसला तरी लक्षात राहते. काही व्यक्तिरेखांमधील कलाकारांची निवड काहीशी खटकते. एकदंरीत चित्रपट प्रत्येकाने आवर्जून पाहावा असाच आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर
लेखक, दिग्दर्शक : रणदीप हूडा
कलाकार : रणदीप हूडा, अंकिता लोखंडे, अमित सियाल, भक्ती क्लेइन, हरनाम सिंग-रुपेरी पडदा : कल्पना खरे

## सुविचार

प्रेम म्हणजे जीवनाचा प्राण होय.

– तिरुवल्लूवर

### संस्कृत सुभाषित

**वासनानां क्षयश्चात स्वाध्यासापनमं कुरू।।**

अर्थ : मन निरंतर स्वस्वरूपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो. म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

**एप्रिलपासून गॅस सिलिंडर पुन्हा महागणार**





## राशी भविष्य

५ एप्रिल २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
ठरलेल्या एखाद्या मंगलकार्याची खरेदी करण्यात वेळ घालवाल. जीवनसाथीबरोबर संबंध चांगले राहतील.

वृषभ : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:उत्तर
मागे केलेले वाचन किंवा गुरु समान व्यक्ती यांचा उपयोग निश्चितच होऊ शकेल.

मिथुन : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पूरब
वैवाहिक जीवनात सामंजस्य व सोशिकतेची भूमिका ठेवणे आवश्यक. प्रकृतीची काळजी घेणे हितावह ठरेल.

कर्क : शुभ रंग : लाल, शुभ दिशा:पश्चिम
वैवाहिक जोडीदाराची मिळणारी साथ महत्त्वाची ठरेल. खाण्या-पिण्याची पथ्ये विसरू नका.

सिंह : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा:पूरब
घरासंबंधीचे प्रश्न, खरेदी-विक्री इ. व्यवहार थोड्याशा प्रयत्नाने व तडजोडीने लाभदायक ठरतील.

कन्या : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:उत्तर
घरगुती प्रश्नात मार्ग काढण्यासाठी होणाऱ्या बैठका यशस्वी होतील. मोठेपणापायी होणारा खर्च टाळा.

तुळ : शुभ रंग : निळा, शुभ दिशा:पश्चिम
वैवाहिक व कौटुंबिक जीवनात घडणाऱ्या शुभ घटनांतून मिळणारा उत्साह बाहेरील ताणतणाव पेलण्यास समर्थ ठरेल.

वृश्चिक : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण
विवाहविषयक बैठका यशस्वी होतील. त्यानिमित्ताने होणारी खरेदी सर्वांच्या पसंतीने होईल.

धनु : शुभ रंग : केसरी, शुभ दिशा:उत्तर
वैवाहिक व कौटुंबिक जीवनात काही आनंददायी घटनांची नोंद होईल. प्रवास करावा लागेल.

मकर : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा:पूरब
घरात मंगलकार्ये ठरतील. मुलांच्या दृष्टीने एखादी शुभवार्ता कानी येईल. व्यवसायात भरभराट होईल.

कुंभ : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:दक्षिण
आर्थिक गणिते जमून येणार असली तरी काही उपद्रवशक्तीचा त्रास होणार नाही असे पहा.

मीन : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
वैवाहिक जीवनात काही प्रेमप्रसंग बहार आणतील. णूकप्रधान खर्च करम बाबीवरील वाढेल.



०४ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर हर्षल व मंगळाचा प्रभाव आहे. तुमचे विचार मूलगामी व क्रांतिकारक असतात. जुनाट परंपरांच्या चौकटी मोडून टाकण्यात तुम्हाला आनंद वाटतो. आपली नवी विचारसरणी लोक नक्की स्वीकारतील असा तुम्हाला आत्मविश्वास असतो. पुष्कळदा आपल्या निर्णयात तुम्ही अनपेक्षितपणे फेरफार करता त्यामुळे लोक तुम्हाला विक्षिप्त व लहरी समजतात. तुमच्याकडे अलौकिक प्रतिभा असते. तिच्या जोरावर भविष्यकालात प्रत्यक्षात येणाऱ्या, येऊ शकणाऱ्या गोष्टींची तुम्ही कल्पनाचित्रे रंगवता.

लोकांमधली विश्वासार्हता कमी होऊ द्यायची नसेल तर आपल्या निर्णयात सतत बदल करणे टाळा. आपले विचार पटवून देण्यासाठी लोकांच्या भावनांना आवाहन करा. अपस्मार, पक्षाघात, मेंदूत रक्तस्राव असे विकार तुम्हाला होऊ शकतात. चंचल, धरसोड वृत्ती टाळण्यासाठी ध्यान आवश्यक.

कार्यक्षेत्र : संशोधनाची आवड असल्याने प्रशासकीय वा हिशोबाशी संबंधीत काम काजापेक्षा तुमचे मन प्रयोगशाळेतच अधिक रमेल. लोकांच्या गराड्यात वावरण्यापेक्षा एकांतातच तुमच्या बुध्दीला जास्त चालना मिळेल. रसायने, उर्जा, इंधने, वीज, अणुऊर्जा यांची निर्मिती व वापर यांचे संशोधन करणाऱ्या संस्थेत तुमचा उत्कर्ष होऊ शकतो. खगोलशास्त्र, अंतराळ विकास, खगोलभौतिकी, परग्रहसंपर्क अशा क्षेत्रात तुमच्या कर्तबगारीस वाव मिळेल.

प्रणयी जीवन : तुमचे विचार, जीवनपध्दती क्रांतिकारक असल्याने सामान्य माणसाला तुमच्याशी जमवून घेणे जड जाते. शिवाय तुमचे विचार कधी बदलतील याची शाश्वती नसल्याने भिन्नलिंगी व्यक्तीला तुमच्याबल थोडी असुरक्षितताही वाटते. जुनाट विचारांच्या माणसांशी जमणे अशक्य असल्याने डिसेंबर २१ ते जानेवारी १९ दरम्यानच्या व्यक्ती टाळा. जानेवारी २० ते फेब्रुवारी १८ मधील व्यक्ती निवडा.

वर्षफळ : या वर्षात स्थानांतर वा बाहेरगावी बदली होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कौटुंबिक खर्चात भर पडेल. जानेवारी फेब्रुवारी मध्ये जागा जमिनीच्या प्रश्नांवर लक्ष्य केंद्रित करावे लागेल. मार्च एप्रिल मध्ये वैवाहिक जीवनातील मतभेद विकोपाला जातील. मे जून मध्ये व्यापारी क्षेत्रात नव्या योजनांचा शुभारंभ कराल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये तरूणांच्या मंगलकार्यांना चालना मिळेल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये उच्च पदावर विराजमान होण्याची महत्वाकांक्षा पूर्ण होईल.

महत्वाचे वर्ष : ४, १३, २२, ३१, ४०, ४९, ५८, ६७, ७६.

भाग्यरत्न : गोमेद

याच तारेखेची व्यक्ती : रामानुजाचार्य, परवीन बॉबी

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




## एखादं नातं तेव्हाच टिकतं जेव्हा..., कुशल बद्रिकेचा चाहत्यांना सल्ला



आता कुशल बद्रिकेने त्याच्या चाहत्यांना नाती टिकवण्याबद्दल एक सल्ला दिला आहे. त्याच्या पोस्टने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.
छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेता म्हणून कुशल बद्रिकेला ओळखले जाते. 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमामुळे तो घराघरात पोहा-चला. याच कार्यक्रमामुळे त्याला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळाली. आता कुशल बद्रिकेने त्याच्या चाहत्यांना नाती टिकवण्याबद्दल एक सल्ला दिला आहे. त्याच्या पोस्टने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.
कुशल बद्रिके हा सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. गेल्या काही दिवसांपासून तो विविध फोटो आणि व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असतो. आता कुशल बद्रिकेने इन्स्टाग्रामवर काही फोटो पोस्ट केले आहेत. हे सर्व फोटो 'चला हवा येऊ द्या' कार्यक्रमाच्या सेटवरील आहेत. या फोटोंना कॅप्शन देताना त्याने नाती टिकवण्याबद्दल एक सल्ला दिला आहे.
कुशल बद्रिकेचा सल्ला-कधी कधी आपल्या आयुष्यातून निघून गेलेली माणसं पुन्हा भेटावीत असं वाटत राहतं, पुढे निघून गेलेल्यांना हाक मारुन थांबवावसं वाटतं आणि मागे राहिलेल्यांसाठी इथे सावलीत थोडा वेळ थांबावसं वाटतं. पण हे फक्त आपल्यालाच वाटत असेल तर ? एखादं नातं तेंव्हाच टिकतं जेंव्हा त्या नात्यातील दोन्ही व्यक्तींना एकमेकांविषयी समान भावना असतात, म्हणून आपण चालत राहतो एखाद्याची हाक ऐकू येई पर्यंत आणि एखादा कुणीतरी सावलीत वाट बघताना दिसे पर्यंत, असे कुशल बद्रिकेने म्हटले आहे.
कुशल बद्रिकेच्या या पोस्टवर अभिनेता संतोष जुवेकरने कमेंट केली आहे. मग तू थांब बघू जरा मी आलोच ४ रीळिश्र नंतर, अशी कमेंट संतोष जुवेकरने केली आहे. त्यावर कुशलने मी थांबलोय संत्या... तू कधीही ये, ख गीीळीश्रॅू अशी प्रतिक्रिया दिली आहे. तर एकाने कुशलला चहा हवा येऊ द्या पुन्हा सुरु होणार का? असा प्रश्न विचारला आहे. त्यावर त्याने होईल, असे म्हणत कमेंट केली आहे. सध्या कुशलची ही पोस्ट चर्चेत आहे.
दरम्यान कुशल बद्रिके हा सध्या सोनी टीव्ही वाहिनीवरील मॅडनेस मचायेंगे' या कार्यक्रमात झळकत आहे. या कार्यक्रमात अनेक मराठी कलाकारही दिसत आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हुमा कुरेशी करत आहे.

## ऐश्वर्या रायचं वजन वाढलं तेव्हा...फ बिग बींच्या सुनेनं इतकं सहन केलं! रवीनाचा धक्कादायक खुलासा



रवीना टंडननं नुकत्याच दिलेल्या एका मुलखतीत ऐश्वर्याचं जेव्हा वजन वाढलं होतं त्यावेळी तिनं काय केलं याचा खुलासा केला.
९० च्या दशकात प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारी अभिनेत्री रवीना टंडनला चित्रपटसृष्टीत अनेक गोष्टींचा सामना करावा लागला. तिला कधी कोणी बॉडी शेमिंग केली. या सगळ्यात त्यावेळी ती काही बोलू शकत नव्हती आणि त्यामुळे तिला हेल्पलेस वाटायचं. खरंतर तिचं म्हणणं आहे की आता सगळं काही बदललं आहे आणि आता सोशल मीडियाच्या मदतीनं ज्या व्यक्तीला जे वाटतं ते स्पष्टपणे मांडू शकतात. आता ती अशा लोकांना उत्तरही देऊ शकते आणि अर्थ नसलेल्या गोष्टींचा विरोधही करु शकते. मोजो स्टोरीसाठी बरखा दत्तशी बोलताना रवीना टंडन ९० च्या दशकाला आठवलं. या दरम्यान, तिनं बॉडी शेमिंगविषयी अनेक गोष्टी सांगितल्या. तिनं बरखा दत्तला सांगितलं की कशी ती ऐश्वर्या राय बच्चनच्या बाजूनं उभी राहिली होती. जेव्हा लेक आराध्याच्या जन्मानंतर ऐश्वर्याला बॉडी शेमिंग करण्यात येत होतं. रवीनानं पुढे हा देखील खुलासा केला की आराध्याच्या जन्मानंतर मीडियामध्ये बॉडी शेमिंग करण्यात येत होती. रवीनानं पुढे हा देखील खुलासा केला की आराध्याच्या जन्मानंतर ऐश्वर्या लाइमलाइटपासून दूर झाली होती. त्यावेळी तिला माहित होतं की ती सगळ्यात चांगली दिसते आणि तिला पुन्हा तिच्या बॉडी शेपमध्ये येण्यासाठी घाई करायची नव्हती. पुढे चर्चा सुरु असताना रवीनाला विचारण्यात आलं की अनेकवर्षं ही गायब राहिल्यानं तिला त्याचं वाईट वाटतं का? यावर उत्तर देत रवीना म्हणाली की मुळीचं नाही, कारण तिला कॅमेरा फ्रेंडली होण्याचा दबाव नको होता. कारण एक ते दिवस होते जेव्हा प्रत्येकाचे तिच्या शरीरावर लक्ष होते तिला लाज वाटेल असं त्यांना नेहमी वाटायचंय.रवीना पुढे म्हणाली की कसं बाळाच्या जन्मानंतर ऐश्वर्यावर निश-णा साधण्यात आला होता. त्यामुळे तिनं लोकांपासून लांब राहणं ठरवलं. जो पर्यंत शक्य आहे तो पर्यंत तिनं बाळाला सांभाळलं. त्यावरच तिनं लक्ष केंद्रित केलं. ती त्यावेळी डायट करण्याकडे किंवा वर्कआऊट करण्याकडे लक्ष देत नव्हती. रवीनानं पुढे सांगितलं की ऐश्वर्याच्या वेळी तिनं मीडियाला एक पत्र लिहितं तिचं समर्थनं करत आणि या गोष्टीवर भर देत सांगितलं की तिला जेव्हा कामावर परतायचं असेल तेव्हा तो तिचाच निर्णय असेल.


# मराठीतील आद्य कवयित्री महदंबा

या वर्षी महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा आठशेव्व्या प्रकट दिनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात चैतन्याचे वातावरण आहे.
महाराष्ट्रात पूर्वी जे समाज प्रबोधन झाले. त्यात फार मोठा वाटा श्री चक्रधर स्वामी आणि त्यांच्या अनुयायांचा आहे. इतकच नाही तर महाराष्ट्रातील आद्य कवयित्री म्हणून आजही साहित्यिक महानुभावातील महदंबाकडेच आदराने पहातात.
स्त्री-लोकगीतांची परंपरा तशी अगदी वेदकाळा पासून प्रचलित असावी, हा लोकवाङ्मयाचा अनुमान आद्य मराठी कविता 'धवळे' वाचून अधिक समृद्ध होतो. तसेही रामायण, महाभारतातही स्त्री गीतांचे उल्लेख आहेत.
संस्कृत कवयित्री विज्जिकाने धान्य दळण कांडताना करताना म्हणत असलेल्या गीतांचे सुंदर वर्णन केले आहे. परंतू यादव काळातील महदंबांच्या 'धवळे' या सारख्या काव्यमागे दीर्घ स्त्री गीताची परंपरा आहे हे निश्चितच जाणवते. महदंबांनी स्त्री असू-नही, स्त्रीमनाचाच सूचक कानोसा आपल्या धवळे काव्यातून घेतला आहे. यादवकाळ हा मराठी साहित्याचा उषःकाल आहे. कारण ह्याच काळात महानुभावपंथ आणि वारकरीपंथ उदयाला आल्याने, त्यावेळी निर्माण झालेल्यां वाङ्मयात एक वेगळेच नाविन्य आढळते आणि साहित्याचे चैतन्य अधिक समृद्ध झालेले जाणवते.
खरं तर स्त्री घटक तेव्हा काहीसा दबलेला असतानाही, याच यादव काळात स्त्रीया गाऊ लागल्या, स्त्रीया लिहू लागल्या. कारण याच काळात नाथ-महानुभाव-वारकरी-समर्थ ह्या प्रमुख संप्रदायांनी आध्यात्मिक क्षेत्रात 'स्त्री' ला स्वातंत्र्य बहाल केले. त्यामुळेच आध्यात्मिक भक्तीच्या रूपाने स्त्री साहित्यातून आपल्या भावना प्रकट करू लागली. म्हणूनच त्याकाळातील संत कवयित्रीं महदंबा, मुक्ताई, जनाई, सोयराबाई, कान्होपात्रा, गोणाई, रजाई, लाडाई, भागू महारीण, निर्मळा, बयाबाई, वेणाबाई, कमळाइसा, नागा-इसा, बाईसाहेब, देमती, नाईकबाई अशा कितीतरी स्त्रीसंतांच्या काव्याचा अभ्यास करताना त्यांच्या स्त्री सुलभ भावाविष्काराचा प्रत्यय ठायी ठायी येतो. त्यातील शब्दकळा, शैली, ठराविक बायकी शब्द वाचताना त्यांच्या स्त्री मनाचा अनुभव येतो. जनाबाईंच्या 'लेकुरवाळा', रूक्मिणीच्या कुंका, बछडे, किंवा सोयराबाईंच्या सडे घालते, नीरांजन ओवाळणे, रांगोळी काढणे ह्यातून स्त्री भाव विश्व फुलून येते. वारकरी संतकवयित्री यांनी जसा अभंग निर्मितीत आपला ठसा उमटवला. तसा महानुभाव संतकवयित्री यांनी ओवी, स्फुट, आख्यानकाव्या बरोबर गेयतेत आपला ठसा उमटवला. महानुभाव पंथाने ज्या अफाट साहित्याची निर्मिती केली, त्यात संत कवयित्रींचा सुध्दा मोलाचा सहभाग आहे.
आजही महानुभाव पंथातील महादंबा ह्या मराठीतल्या आद्य कवयित्री आणि महानुभाव पंथातील श्रेष्ट विदुषी म्हणूनच गणल्या जातात. त्यांच्या काव्याचा अभ्यास केला तर त्यात कलाभिरुची, सडेतोडपणा, चातुर्य, वैराग्य, स्त्रीसुलभमस्तर, पंथनिष्टा ह्या सगळ्या गुणांचा त्यांच्या प्रतिभेशक्तीत समावेश आहे हे जाणवते.
अर्थात 'धवळे' काव्यावरुन महदंबांची आद्य कवयित्री म्हणून ओळख असली तरी मातृका,



गर्भकांड ओव्या, रूक्मिणीस्वयंवर, स्फुट पदे ही उत्स्फूर्त भाषाशैलीतून नाट्यपूर्ण प्रसंग दाखवणारी आहेत. किंबहुना सांकेतिक आणि बोलीभाषेमूळे त्याला लोकगीताचा घाट प्राप्त झाल्याचेही अभ्यासकांनी म्हंटले आहे.
धवळ्यातील ओवीत महदंबा म्हणतात...
रूक्मिणीसी सखिया सांघती वृत्तांतु
सर्वांगी न देखेचि तुझा ओ कांतु
देखिले तेचि आंग तेथोनिया नयन न ढळती
ह्यावर प्रा. कुरूंदकर आपल्या समिक्षणात म्हणतात की 'धवळ्याला वाचताना हे एका स्त्रीचे लिखाण वाचत आहोत, असे जाणवत नाही. स्त्री सुलभ सावधगिरी स्त्रीच व्यक्त करू शकते म्हणून त्यातील गोडवा टिकून आहे. 'धवले' हे महदंबचे मराठीतील हे पहिले आख्यानकाव्य ज्याच्यातून तत्कालीन विवाह पद्धतीवर प्रकाश पडतो तसेच केळवण करणे, निंबलोण करणे, मूळ पाठवणे, जोहार करणे, पवाड करणे, कळस ढाळणे असे खूप वाक्प्रचार ह्यामध्ये आढळतात.
विशेष म्हणजे महदंबा धवळ्यात स्वत:ला रुक्मिणीची सखी म्हणवतात आणि कृष्णाच्या रूपाचे वर्णन करून झाल्यावर मात्र त्या रूक्मिणीस सांगतात की... 'तुझा पती आम्हाला वंदनीयच आहे. दुसरा विचार आमच्या मनात येत नाही त्याच्या बद्दल'... ह्या वाक्यातच स्त्रीच्या मनातील लज्जा, सावधपणा, शंका, असूया इत्यादी संमिश्र भावसंकुलन मोठ्या कौशल्याने महदंबांनी प्रकट करून स्त्री मनाचा उत्तम कानोसा घेतला आहे.
महदंबांच्या काही स्फुट रचना गेय स्वरुपाच्या आहेतच, तसे धवळे सुध्दा गेयच आहे. ते गाण्यातून प्रकटले आहे. तसही ओवी, अभंग, पदे, चौपद्या, आरती, खेळिये ह्या रचना स्त्री मनाच्या निर्मितीला पूरकच, त्यामुळे 'गेयता' हा गुण स्त्री गीतापासून आलेला असे वाटते.
श्री. चक्रधर स्वामींच्या साहित्याचा प्रचंड प्रभाव महदंबेच्या लिखाणावर जाणवत असला तरी, संन्यास दीक्षा घेतल्यानंतर महदंबांनी, स्त्री-पुरुष समानतेचा, हा महनुभाव पंथाचा दृष्टीकोन ठेवून वाङ्मय निर्मितीतून मोलाची भर टाकली आहे. महदंबांचे काव्य कथनात्मरुप आहे; पण त्यात मुलभूत प्रेरणा ही भक्तीभावाचीच आहे.
'कृष्ण म्हणजे मुक्ती' आणि 'कृष्ण म्हणजे जीवन' हे तत्त्वज्ञान सांगताना महदंबांनी त्यामागील रूक्मिणीची आध्यात्मिकता अधोरेखित केली आहे. 'कृष्णावर पदे लिहून आपला अभ्यास झाला' असे म्हणणाऱ्या महदंबांच्या, स्फुटांचा ओवींचा अभ्यास करताना त्यांच्यातील संतत्वाची नकळत जाणिव होवून, ह्या आद्य कवयित्रीच्या अफाट प्रतिभेचे दर्शन सुध्दा होते.
म्हातारी धर्म रक्षक
म्हातारी प्रीतिरक्षक
असा गौरव साक्षात नागदेवचार्यांनी महदंबांचा केला आहे. अध्यात्मज्ञान या दृष्टीने त्या पंडिता होत्या म्हणूनच त्यांनी रुक्मिणीच्या भावावस्थेला काव्यातून उत्कट शब्दात विलक्षण रूप दिले आणि त्यातून व्यक्तीरेखा जिवंतपणे साक्षात करणे ह्यातच महदंबांच्या भक्तीचे कर्तृत्व सिद्ध होते.
माहूर येथे दत्त दर्शनाच्यावेळी महदंबां म्हणतात...
अमोघासिध्दी जयाचिया दारी
तो मानापुरी राज्यकरी
तया नमन दत्तोत्रया
अशा ह्या महदंबांच्या खुपशा कविता तीन किंवा साडेतीन ओवींच्या असून, त्या सुंदर शब्दचित्र रेखाटतात.महानुभावातील कृष्णभक्ती, वारकरी पंथाची विठ्ठलभक्ती, समर्थ संप्रदायातील रामभक्ती वेगळी असली तरी, त्यात एकाच देवाचे दर्शन घडते आणि गुरुनिष्ठा, कृतज्ञता, ईश्वरभक्ती सर्वांच्याच काव्यात सारखीच दिसते.तरी 'धवळे' सारखी आद्य कविता लिहिणाऱ्या, आद्य कवयित्री म्हणून महदंबांचा संपूर्ण महाराष्ट्राला नक्कीच अभिमान आणि मनात प्रचंड आदर आहे.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर
आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा
उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य सलत ६५.नापास ६७.म ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# शिवाजी महाविद्यालयचे अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत यश



**देवणी (प्रतिनिधी)** उदगीर-सावित्रीबाई फ्फ़ुले पुणे विद्यापीठ पुणे व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय अंतर विद्यापीठ बेसबॉल महिला स्पर्धा नुकत्याच बारामती येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेत शिवाजी महाविद्यालय उदगीरच्या कु. बुंदराळे प्रतीक्षा नरसिंग बी. ए. तृतीय वर्ष या खेळाडूचा सहभाग स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या संघात होता.

सदर स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावले. या खेळाडूच्या यशाबद्दल खेळाडूंना नेहमी प्रोत्साहित करणारे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सचिव पांडुरंग शिंदे, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील व सर्व कार्यकारिणी सदस्य, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अरविंद नवले, उपप्रचार्य प्रा. डॉ. एस. व्ही. जगताप, प्रा. डॉ. आर. एम. मांजरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विलास भोसले, पर्यवेक्षक प्रा. जि. जी. सूर्यवंशी, शिक्षक व कर्मचारी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले. खेळाडूला क्रीडा विभाग प्रमुख प्रा. नेहाल अहमद खान , प्रा. गजानन माने यांनी तंत्रशुद्ध पद्धतीचे मार्गदर्शन केले.

# बीकॉम टी वाय च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील बीकॉम तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.ह.वा.कुलकर्णी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.आर.के.मस्के उपस्थित होते यावेळी व्यासपीठावर वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.बी. एस. होकरणे, प्रा.डॉ. एस.एन.घोंगडे, प्रा.खरात, प्रा.गणेश पळणाटे, इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.बी. एस.होकरणे यांनी केले. या वेळी बी.कॉम.तृतीय वर्षातील विद्यार्थी मोतीपवळे शुभम, वैजापूरे प्रसाद, टिलानी ईशिका, कोनमारे कोमल, सोनार सपना, पांडुरंग जळकोटे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे कुलकर्णी बोलताना म्हणाले, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत, त्या संधीचा शोध घेऊन उज्वल भविष्य घडविणे काळाची गरज आहे. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य मस्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात घेतलेल्या शिकवणीचे अनुकरण भविष्यात करुन एक समाजशील नागरिक म्हणून ओळख निर्माण करणे आवश्यक आहे. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त पाळणे ही काळाची गरज आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.कॉम.प्रथम वर्षातील कु.शुभांगी फ्फ़ड यांनी केले तर आभार तृतीय वर्षाचा विद्यार्थी शुभम मोतीपोळे यांनी मानले.

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ५१ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार बालेसाब पि. इब्राहिम बदनाळे ज्यापेक्षा आई नामे राबीयाबी इब्राहिमसाब बदनाळे हे दिनांक २४/११/२०२२ रोजी मौजे कमरोद्दीनपुर ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | बालेसाब पि. इब्राहिम बदनाळे, रा. कमरोद्दीनपुर ता.देवणी जि.लातूर | ६५ | मुलगा |
| २) | महमदसाब पि. इब्राहिम बदनाळे रा. कमरोद्दीनपुर ता.देवणी जि.लातूर | ६० | मुलगा |
| ३) | मौलाना पि. नजीरसाब मानुल्ला रा. दवणहिप्परगा ता.देवणी जि.लातूर | ३८ | नातू |
| ४) | फराह उर्फ बेबी भ्र. जलील पटेल, रा. भुमपल्ली ता.जि.बिदर | ४० | नात |
| ५) | नुरजहॉबी भ्र. नुरसाब सय्यद रा. कासारखेडा ता.जि.लातूर | ५५ | मुलगी |
| ६) | नसीम भ्र. महेबुबेग मिर्झा रा. देवणी बु. ता.देवणी जि.लातूर | ५२ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०३/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०७/०५/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

# उशीरा लग्न आणि आनुवंशिक आजार यामुळे बालकात डाऊन सिंड्रोम आजाराची शक्यता

## पालकानी जागरूक असणे महत्वाचे – डॉ. संगमेश्वर दाचावार




**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर – उशीरा लग्न झालेल्या ३५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांमध्ये डाऊन सिंड्रोम असलेल्या मुलाला जन्म देण्याचा धोका जास्त असतो. तसेच डाउन सिंड्रोम हा एक आनुवंशिक आजार आहे. हा आजार प्रामुख्यानं मुलांमध्ये दिसून येतो. आनुवंशिक कारणांमुळे मुलांमध्ये काही शारीरिक दोष निर्माण होतात. वैद्यकीय क्षेत्रात प्रगत तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. अशा तंत्रज्ञानाचा वापर करून या आजाराविषयीची तपासणी, निदान आणि उपचार शक्य आहेत. मात्र यासाठी पालकांनी विशेष जागरूक असणं गरजेचं आहे.असे डॉ. होटूळकर यांनी सांगितले . सक्षम दिव्यांग सेवा केंद्र उदगीर आणि कस्तुराबाई नर्सिंग स्कूल द्वारा जागतिक डाऊन सिंड्रोम दिन मातृभूमी प्रतिष्ठान च्या कस्तुराबाई नर्सिंग स्कुल मध्ये साजरा करण्यात आला .

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य उषा कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून फिफ्रजिशियन डॉ.संगमेश्वर दाचावार, बालरोग तज्ञ डॉ.शिवकुमार होटूळकर, कान नाक घसा तज्ञ डॉ. संजय कुलकर्णी, प्रा.डॉ. रविकांत पाटील उपस्थित होते .

जागतिक डाऊन सिंड्रोम दिनानिमित्त आयोजित या जनजागृती कार्यक्रमाच्या प्रास्तविकात डॉ. संजय कुलकर्णी यांनी मसक्षमफ या राष्ट्रीय संघटनेची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि उदगीर येथे नव्याने सुरु करण्यात आलेल्या मसक्षम दिव्यांग सेवा केंद्रफ याविषयी माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा बिभीषण माद्देवाड यांनी केले तर आभार प्रा.डॉ. रविकांत पाटील यांनी मानले . यावेळी रेखा रंनक्षेत्रे , आकाश राठोड , रेखा रणक्षेत्र , राहूल जाधव, उषा साताळकर यांच्या सह प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ५६ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार महेश पि. अशोक हत्ते ज्यापेक्षा आई नामे महानंदा अशोक हत्ते हे दिनांक १३/०१/२०२३ रोजी विलास देशमुख गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज अण्ड हॉस्पीटल, लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | महेश पि. अशोक हत्ते | ४८ | मुलगा |
| २) | संगीता भ्र. केशवराव काळे | ४० | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०३/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०७/०५/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)






## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ५४ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार तेजाबाई भ्र. चंद्रकांत मोरे ज्यापेक्षा पती नामे चंद्रकांत काशिनाथ मोरे हे दिनांक १३/०४/२०२१ रोजी मौजे गोरचिंचोळी ता.भालकी जि.बिदर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | तेजाबाई भ्र. चंद्रकांत मोरे | ५७ | पत्नी |
| २) | माणिक पि. चंद्रकांत मोरे | ३८ | मुलगा |
| ३) | लक्ष्मी भ्र. विनोद सुर्यवंशी | ३९ | मुलगी |
| ४) | उषा भ्र. अंबादास सुर्यवंशी | २७ | मुलगी |
| ५) | शिवनंदा भ्र. शिवाजी सुर्यवंशी | २६ | मुलगी |
| ६) | शिल्पा भ्र. नागनाथ सुर्यवंशी | २५ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०३/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०७/०५/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ५७ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार सरुबाई भ्र. प्रल्हाद भंडे ज्यापेक्षा पती नामे प्रल्हाद पि. श्रीपती भंडे हे दिनांक १०/०३/२०२४ रोजी मौजे.टाकळी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | सरुबाई भ्र. प्रल्हाद भंडे | ७५ | पत्नी |
| २) | माधव पि. प्रल्हाद भंडे | ३० | मुलगा |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०४/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०७/०५/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)






### उदगीर मनोरंजन

**कल्पना** 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




### उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# दुसरे निवडणूक खर्च अधिकारी देगलूरला दिली भेट

## विविध विभागांचा घेतला आढावा ; खर्चावर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आवाहन

देगलूर (प्रतिनिधी) : नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त दुसरे वरिष्ठ सनदी अधिकारी निवडणूक खर्च निरीक्षक अधिकारी मगपेन भुतिया यांनी भेट दिली व देगलूर -(९०)विधानसभा क्षेत्राचा दि. ०४ एप्रिल गुरुवार रोजी दुपारी विविध समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला.

दरम्यान भुतिया यांनी देगलूर तहसील कार्यालयातीत मिडीया कक्षास भेट दिली

उमेदवारांच्या व राजकीय पक्षाच्या बातम्या, जाहिराती पेड न्युज यावर कडक नजर ठेवण्याच्या सूचना दिल्या तसेच खर्चावर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.




यावेळी नांदेड लोकसभा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी सचिन गिरी, देगलूर निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार तथा मिडिया कक्ष प्रमुख संजय नागमवाड, नायब तहसीलदार राम पंगे ,मिडीया कक्षाचे सहाय्यक नरहरी कोलगाणे, शिवानंद स्वामी, संतोष मठदेवरू , शिकारे व्हि. के., महेश कुलकर्णी, आदी सह इतर अधिकारी ,कर्मचारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

नांदेड लोकसभा मतदारसंघातील ८९- नायगाव, ९०- देगलूर, ९१-मुखेड या तीन विधानसभा क्षेत्रासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून भुतिया हे कार्यरत राहणार आहेत.

खर्चावर निरीक्षण ठेवण्याची जबाबदारी मगपेन भुतिया यांची आहे. मगपेन भुतिया हे शासकीय विश्रामगृह येथे निवासी असून त्यांना कार्यालयीन वेळेमध्ये खर्चाच्या संदर्भातील कुठल्याही तक्रारी, गाऱ्हाणी व सूचनांसाठी संपर्क साधता येऊ शकतो असे निवडणूक विभागाचे वतीने सांगण्यात आले.

# महात्मा बसवेश्वरांचे सर्वांना चित्र कळाले, चरित्र कळावे म्हणून ग्रंथाची निर्मिती केली: प्रा सुदर्शनराव बिरादार

सोलापूर -१२ व्या शतकातील महान समाजसुधारक जगत्ज्योती महात्मा बसवेश्वरांचे चित्र सर्वांना कळाले आहे.

पण त्यांचे चरित्र अजून सर्वांपर्यंत पोहोचले नाही.महात्मा बसवेश्वरांचे चरित्र,कार्य व वचने सर्वांना समजावे म्हणून समग्र महात्मा बसवेश्वरया ग्रंथाची निर्मिती केली असल्याचे मत लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष तथा या ग्रंथाचे लेखक प्रा सुदर्शनराव बिरादार यांनी काल सोलापुरातील डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृहात लिंगायत महासंघाच्या सोलापूरच्या वतीने आयोजित ५०० महिलांना मोफत ग्रंथ वितरण कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले .

ते बोलताना पुढे म्हणाले की, आजपर्यंत महात्मा बसवेश्वरांचे सर्व साहित्य कन्नड भाषेत उपलब्ध होते. ते समजून घेण्यासाठी मराठी भाषिकांना अडचणी येत होत्या.या अडचणी दूर व्हावेत म्हणून मराठी भाषेत या ग्रंथाची निर्मिती केली आहे. या ग्रंथात महात्मा बसवेश्वरांची संपूर्ण माहिती एकाच ठिकाणी



दिली आहे.आज ५०० महिलांना या ग्रंथाचे मोफत वाटप करण्यात आले यावेळी माजी आमदार शिवशरण बिराजदार पाटील, पुष्पाताई गुंगे , सिंधुताई काडादी, सिद्धराम चाकोते, प्रा.एम.बी. पठाण , चंद्रकांत रमणशेट्टी आदींची भाषणे झाली.

यावेळी परमानंद आलगौडा, सुरेश वाली , काशिनाथ गतकची, सतिश शेंडे, डॉ वसंतराव लवंगे, सुभाष काडादीअप्पा, मल्लिकार्जुन मुलगे, सिद्धराम चाकोते, लिंगायत महासंघाचे शिवदास बुलबुले, मल्लिनाथ जट्टे, शिवानंद धुत्तरगी. सुमनबाई जाधव, प्रमिला ताई तुपलोंढे, यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लिंगायत महासंघाचे सोलापूर शहराध्यक्ष शिवानंद धुत्तरगी यांनी , वैजनाथ जट्टे यांनी परिश्रम घेतले.या वेळी चंद्रकांत रमणशेट्टी यांची लिंगायत महासंघाच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी प्रा.सुदर्शनराव बिरादार यांनी निवड केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.एम बी पठाण यांनी केले असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले.

# देशाचा कारभार कुणाच्या हाती द्यायचा हे ठरविण्यासाठी लोकसभा निवडणूक

लोकसभा निवडणूक म्हणजे ग्रामपंचायत निवडणूक नसुन देशाचे भवितव्याचा निर्णय घेण्यासाठी देशातील नागरिकांना एक सुवर्णसंधी असते. देशाचा कारभार सक्षम आणि एकमुखी नेतृत्वाच्या हाती द्यायचा कि वेळोवेळी परस्परांच्या विरोधात लढलेल्या विस्कळीत पक्षांच्या हाती द्यायचा,याचा निर्णय घेणारी ही निवडणूक आहे. विकसित व बलशाली भारताचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकार सत्तेवर आणणे,ही काळाची गरज आहे.

मत कुणाला द्यावे हे नाही समजलं तर अभिनंदनच्या आईला विचारा!, काश्मीरी हिंदुंना विचारा! , अयोध्येच्या संतांना विचारा, कोठारी बन्धुच्या बहीणीला विचारा, यूक्रेनमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विचारा, किसान निधि मिळणाऱ्या शेतकऱ्यांना विचारा, इस्रोच्या वैज्ञानिकांना विचारा, सीमेवर दक्ष असणाऱ्या सैनिकांना विचारा, काशी विश्वनाथच्या भक्तांना विचारा, तीन तलाक पासून सुरक्षित झालेल्या मुस्लिम महीलांना विचारा, बाबा बर्फानी केदारनाथच्या भक्तांना विचारा, विदेशात कमाई करणाऱ्या भारतीयांना वचारा, उदयपुरच्या कन्हैयालालच्या कुटुंबियांना विचारा, केरळ आणि ईशान्य भारतातील पिडित जनतेला विचारा, राम जन्मभूमी मंदीराचे स्वप्न पाहणाऱ्या सामान्य जनतेला विचारा, अखंड भारताच्या विभाजनाचा ईतिहास लिहीणाऱ्यांना विचारा, देशभर निर्माण झालेल्या रस्त्यांच्या जाळ्याचा वापर करणाऱ्या जनतेला विचारा, भारताच्या आर्मीला विचारा, बँकेच्या खात्यात थेट पैसा जमा होतो त्या जनतेला विचारा, कोरोना साथीपासून उपाशी लोकांना आजवर मोफत राशन मिळणाऱ्या लोकांना विचारा, आयुष्मान कार्ड मिळालेल्यांना विचारा, पक्के घर मिळालेल्या गरीबांना विचारा, मोफत सुरक्षित घर मिळून आसरा मिळालेल्या गरीबांना विचारा , कतार मध्ये सेनेच्या ८ पूर्व अधिकाऱ्यांना मिळालेल्या फाशीच्या शिक्षेला माफ करवून मोदीजींनी भारतात परत आणलं, त्या ८ अधिकाऱ्याच्या घरच्या लोकांना विचारा, बंधुंनो! एक लक्षात ठेवा, ाजपा उमेदवाराला मत म्हणजे नरेंद्र मोदींना मत!

- **विनायक देशमुख** , अहमदनगर




# देगलूर स्वीप कक्षाची टीम पोहंचली डम्पिंग ग्राउंडवर

देगलूर(प्रतिनीधी):- लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ मध्ये नांदेड लोकसभा मतदार संघात मतदानाचे प्रमाण वाढावे आणि सामान्य मतदारात मतदानाविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने जिल्हाधीकारी डॉ. अभिजीत राऊत व उपजिल्हाधीकारी सचिन गिरी यांच्या मार्गदर्शनाख़ाली विविध उपक्रम राबविले जात आहेत.

त्यासाठी देगलूर तहसील कार्यालयातील स्वीप कक्षाद्वारेही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत .

देगलूर शहर व परिसरातील मतदानाचा टक्का वाढावा या उद्देशाने कामगार, उपेक्षित व वंचित घटकापर्यंत मतदान जनजागृती कक्ष पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे.

आज देगलूर येथील घनकचरा व्यवस्थापन म्हणजेच डम्पिंग ग्राउंडवर काम करणाऱ्या कष्टकरी-कामगार लोकांना लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याची विनंती करण्यात आली .

त्याचप्रमाणे मतदानाचे पावित्र्य राखण्याची शपथ देखील देण्यात आली. याप्रसंगी स्वीप कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. बालाजी कतुरवार , डॉ. संजय देबडे, बालाजी सुगावकर , शिवप्रसाद स्वामी, धनाजी दौलते, कोळनूरे बी. एम. यांच्यासह संजय कांबळे व कामगार वर्ग उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी स्व-कर्तुत्वाने आई-वडिलांचा नाव लौकिक करावा

लातूर / प्रतिनिधीः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक कालखंडामध्ये कष्ट, सातत्य आणि गरीबीवर मात करून स्व-कर्तुत्वाने आपल्या जन्मदात्या आई-वडिलांचा समाजामध्ये नाव लौकिक करावा असे भावनिक उद्गार सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहामध्ये शिव-बसव वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ निरोप आणि प्रमाणपत्र वितरण समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर विशेष उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, विद्यार्थी परिषदेचे प्रभारी डॉ. कॅप्टन बाळासाहेब गोडबोले, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आणि कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. विठ्ठल लहाने म्हणाले की, तरुणाईने दारिद्र्याची लाज न बाळगता आपल्या अस्तित्वासाठी आणि अस्मितेसाठी पेटून उठले पाहिजे आणि एका नव्या विश्वाची निर्मिती केले पाहिजे. विद्यार्थी आणि शिक्षक देशाचे भविष्य आहे. उत्तम शिक्षण आणि शिक्षकांमुळे सुजाण नागरिक तयार होतात असेही ते म्हनाले.

यावेळी महाविद्यालयातील गुणवंत प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभागातील गुणवंत विद्यार्थी आणि वार्षिक स्नेहसंमेलनातील विजेते स्पर्धक यांना स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.यावेळी पाहुण्यांचा परिचय आणि मनोगत उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी व्यक्त केले आणि अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. आशिष क्षीरसागर, डॉ. अभयकुमार धाराशीवे, कु. वैष्णवी फरकांडे, कु. ऋतुजा भिसे, कु. धनश्री भंडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी मानले.

**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER- HASHMI NAZIRULLA MAZHARULLA TO: HASHMI NAJIRULLA MAJRULLA HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE HASHMI NAJIRULLA MAJRULLA IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE

**OLD NAME**
HASHMI NAZIRULLA MAZHARULLA
**NEW NAME**
HASHMI NAJIRULLA MAJRULLA
**ADDRESS**
HASHMI NAGAR TQ AUSA DIST LATUR 413520

**टी.सी.हरवली आहे**

सय्यद सैफ मझरोद्दीन या नावाची कमला नेहरू विद्यालय खोरी गल्ली लातूर या शाळेची १०वी नापास ची टी सी शिवाजी चौक परिसरात हरवली आहे कुणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**मो :- ८७९९८९७६०९**

**जाहीर प्रगटन**

माझे पक्षकार शिवकांता पांडूरंग गुराडे व श्रीकृष्ण पांडूरंग गुराडे रा. श्रीकृष्ण नगर, स्क्रॅप मार्केट, लातूर, यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकारावरून, तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकाराने खरेदीतखत क्र. २७११/१९८१ दिनांक २१/०८/१९८१ अन्वये लातूर येथील सिटी सर्वे नं. २८१६/२ (जुना) व २८१६ (नवीन) असुन त्याचा म. न. पा. घर क्र. आ-७/१९३८ (जुना), सी-२/७२६/१ (नवीन) असा आहे व त्याची लांबी दक्षिण-उत्तर ६० फुट व रुंदी पुर्व-पश्चिम २० फुट असुन एकुण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट आहे. याची चतु:सिमा खालील प्रमाणे

**पुर्वेस :** सदरील नंबर पैकी त्र्यंबक नारायण सुर्यवंशी याचा भाग,
**पश्चिमेस**-कांबळे यांचा प्लॉट,
**दक्षिणेस**-कोडगीरे यांचा प्लॉट,
**उत्तरेस**-सरकारी रस्ता.

वरील कागदपत्रे/मुळ खरेदीखत हे माझे पक्षकाराकडून शिवाजी चौक, लातूर परीसरात गहाळ झाले असुन, ती कागदपत्रे कोणास आढळल्यास व सापडल्यास व सदरील कागदपत्रासंबंधी किंवा जो व्यक्ती कागदपत्रा आधारे कसल्याही प्रकारचा व्यवहार करीत असेल तर माझे पक्षकार बेकायदेशीर कृत्याबाबत जबाबदार राहणार नाहीत. तरी कोणाला वरील नमुद कागदपत्राबाबत माहिती असेल तर खालील नमुद पत्त्यावर कळवावे अथवा कोणाकडे वरील नमुद मुळ खरेदीखत जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत सदरील कागदपत्राबाबत जर नाही मिळाली तर माझे पक्षकार सदरील कागदपत्रांची नक्कल संबंधीत कार्यालयातून काढून घेतील व योग्य ती पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.

**तर्फे**
**ॲड. व्ही. एस. स्वामी,**
**औसा हनुमान, लातूर,**
**मो. क्र. ९४०५७३७७७०.**

**जाहिर प्रगटन देणार**
**शिवकांता पांडूरंग गुराडे**
**श्रीकृष्ण पांडूरंग गुराडे**
**मो. क्र. ९३७३४६०४७०**

पान १ वरून

### नेपाळमार्गे ...

हिजबुल मुजाहिद्दीनच्या प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षणही घेतले असून भारतात दहशतवादी कारवाया करण्याची योजना आखत होते. काही दिवसांपूर्वीच युपी एटीएसला ही माहिती मिळाली होती. दोन पाकिस्तानी व्यक्ती नेपाळमार्गे भारतात येणार असल्याची माहिती गोरखपूर युनिटला देण्यात आली. यानंतर ३ एप्रिल रोजी एटीएसच्या गोरखपूर युनिटने नेपाळ भारत बॉर्डवरुन तीन आरोपींना अटक केली. मोहम्मद अल्ताफ भट, सय्यद गझनफर आणि नासिर अली अशी आरोपींची नावे आहेत. मोहम्मद अल्ताफ भट हा रावळपिंडी, पाकिस्तानचा रहिवासी आहे, सय्यद गझनफर हा इस्लामाबाद, पाकिस्तानचा रहिवासी आहे, तर नासिर अली हा जम्मू-काश्मीरच्या श्रीनगरचा रहिवासी आहे.

आरोपींची छायाचित्रे प्रसिद्ध

तिन्ही आरोपींना अटक केल्यानंतर एटीएसने त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडून २ मोबाईल फोन, २ मेमरी कार्ड, ३ पासपोर्ट, ७ डेबिट आणि क्रेडिट कार्ड, ३ आधार कार्ड, २ विमान तिकिटे, पाकिस्तानी ड्रायव्हिंग लायसन्स, पाकिस्तानी राष्ट्रीय ओळखपत्र, परदेशी ओळखपत्र जप्त करण्यात आले. नेपाळ, बांगलादेश, भारत आणि अमेरिकेचे चलन जप्त करण्यात आले आहे. यूपी एटीएसने अटक केलेल्या मोहम्मद अल्ताफ भट, सय्यद गझनफर आणि नासिर अली या तीन आरोपींचे फोटोही शेअर केले आहेत.

### निलंगा मतदार...

पुढील प्रवासादरम्यान गुरनाळ गावच्या ग्रामस्थांची स्नेहभेट घेऊन सत्कार स्वीकारला. तसेच अनंत गोमसाळे यांचे सुपुत्र चि .अमोल व चि. सौ. का. राजश्री यांच्या शुभविवाहास उपस्थित राहून नमदाम्पत्यास भावी सुखी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

वलांडी शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. शहरातील बालाजी मंदिर येथे मनोभावे दर्शन घेऊन नागरिकांच्या उन्नतीसाठी यावेळी प्रार्थना करण्यात आली हुडगे यांच्या कापड दुकान प्रतिष्ठानला स्नेह भेट देऊन जनतेशी संवाद साधला.

देवणी येथील श्री सद्गुरु शेषनाथ महाराज देवस्थानात पूजा करून विवेकवर्धिनी माध्यमिक विद्यालय, देवणी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष वैजनाथ आष्टुरे यांच्या निवासस्थानी सस्नेह भेट दिली. यावेळी भाजपा प्रदेश चिटणीस आणि लातूर जिल्हा प्रभारी श्री. किरणजी पाटील, भाजपा जिल्हा सरचिटणीस श्री. संजय दोरवे, भाजपा जिल्हा सरचिटणीस श्री. भारत चामे, भाजपा युवा मोर्चा ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. अमोल निडवदे, शिवसेना जिल्हाप्रमुख (शिंदे गट) श्री. शिवाजीराव माने, उपजिल्हाप्रमुख श्री. विनोद आर्य, जिल्हा उपाध्यक्ष श्री. शेषराव मोरे, भाजपा तालुका अध्यक्ष श्री. कुमुद लोभे ,माजी नगराध्यक्ष श्री. वीरेंद्र स्वामी, निलंगा विधानसभा निवडणूक प्रमुख श्री. दगडू साळुंखे, शहर भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष श्री. तम्मा माडीबोने, रिपाई जिल्हा उपाध्यक्ष श्री. अंकुश ढरे, शिवसेना तालुकाप्रमुख तानाजी सूर्यवंशी, मुस्ताक शेख, सुधीर पाटील, संजय हलगरकर ,रवी कांबळे, दत्ता मोहोळकर, काशिनाथ गरिबे, तालुकाध्यक्ष रामलिंगेश्र्वर शेरे, माजी जि.प. अध्यक्ष श्री. पंडितराव धुमाळ, श्री. दीपक मगे, श्री. मुस्ताक शेख, श्री. सुधीर पाटील, श्री. दत्ता मोहोळकर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया जिल्हा उपाध्यक्ष श्री. अंकुश ढरे, श्री. मनोहर पटणे, श्री. शंकर पाटील तळेगावकर, श्री. मनोहर पाटील, श्री. दिलीप मगे, श्री. संदीप पेठे, श्री. अनिल मस्के, प्राचार्य डी. वी.राजे याचेसह कार्यकर्ते ,पदाधिकारी ,शिवसैनिक, नव मतदार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घड्याळ...

काळजी घेण्यासाठी पदाधिकारी, उमेदवार आणि समर्थकांना सांगितले जाईल, असे आश्र्वासनही दिले. याचवेळी सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार गटाला त्यांच्या कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे, असे निर्देश दिले.

दरम्यान, भित्तीपत्रके, जाहिराती, ऑडिओ किंवा व्हीडीओ क्लिप यांमधील डिस्क्लेमरच्या क्रमात बदल करण्याची परवानगी मिळण्याबाबत अजित पवार गटाकडून अर्ज करण्यात आला होता. तर, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न केल्याप्रकरणी अजित पवार गटावर कारवाई करावी, अशी मागणी करणारा अर्ज शरद पवार गटाकडून करण्यात आला होता. मात्र, हे दोन्ही अर्ज न्यायालयाने फेटाळून लावले आणि अवमानाची कारवाई करण्याची किंवा पूर्वीच्या आदेशात बदल करण्याची गरज नाही, असे स्पष्ट केले.

### बंडखोर...

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मविआसोबत फिसकटल्यानंतर दलित, मराठा उमेदवार देण्याबाबतची घोषणा केली होती. त्यानुसार त्यांनी पुण्यात मराठा चेहरा म्हणून वसंत मोरे यांच्या नावाची घोषणा केली आहे. हाच प्रयोग नाशिक लोकसभा मतदारसंघातदेखील केला जाण्याची शक्यता आहे.

त्यामुळे आतापर्यंत वंचितकडून अनेक मराठा उमेदवारांची नावे चर्चेत आली आहेत. त्यामध्ये विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांचे नावदेखील पुढे आल्याने, अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांचे नाव उमेदवारीसाठी आघाडीवर असल्याने, शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांची उमेदवारी धोक्यात आली आहे. परंतु जोपर्यंत नावाची घोषणा होत नाही, तोपर्यंत ते नाशिकच्या जागेवर दावा ठोकून आहेत. दुसरीकडे पत्ता कट केल्यास, पर्याय म्हणून वंचितच्या तिकिटावर लढण्याची त्यांची तयारी असल्याचेही बोलले जात आहे.

### नवनीत...

अमरावतीच्या खासदाराला २ लाखांचा दंडही ठोठावला होता.

### तीन आमदारपत्नींना...

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश झाला, त्यानंतर त्यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे, तुळजापूरचे भाजपा आमदार असलेल्या राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नीला ही उमेदवारी मिळाली आहे. महायुतीने आतापर्यंत जाहीर केलेल्या उमेदवारांपैकी ३ विद्यमान आमदारांच्या पत्नींना उमेदवारी दिली आहे. त्यामध्ये, धाराशिव, बारामती आणि अमरावती लोकसभा मतदारसंघातून ही उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे, लोकसभेची निवडणूक ही आपली निवडणूक, आपली माणसे असा राजकीय कार्यक्रम असल्याचेही दिसून येते. भाजपाने अमरावतील लोकसभा मतदारसंघातून नवनीत राणा यांना उमेदवारी दिली आहे. नवनीत राणा यांचे पती रवि राणा हे अमरावती जिल्ह्यातील बडनेरा मतदारसंघातून आमदार आहेत. त्यामुळे, आमदारपत्नीला भाजपाने लोकसभेच्या मैदानात उतरवल्याचे दिसून येते. त्यानंतर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी आहेत. अजित पवार हे बारामती विधानसभा मतदारसंघातून आमदार आहेत. आता, महायुतीकडून आणखी एका महिला उमेदवाराची घोषणा झाली, ज्यांचे पती विद्यमान आमदार आहेत. धाराशिव लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीच्या उमेदवार अर्चना पाटील यांचे पती तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. विशेष म्हणजे ते भाजपा नेते असून आजच त्यांच्या पत्नीने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सोडवताना आणि काही जागांचे साठेलोठे करताना अशाप्रकारे तीन विद्यमान आमदारांच्या पत्नींना लोकसभेच्या रणांगणात उतरवण्यात आले आहे. त्यामध्ये, भाजपाने १ तर राष्ट्रवादी काँग्रेसने २ उमेदवार दिले आहेत. भाजपाने आतापर्यंत २४ जागांवर उमेदवारांची घोषणा केली. तर, राष्ट्रवादी काँग्रेसने परभणीची जागा महादेव जानकर यांना दिली असून आतापर्यंत चार जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. या दोन्ही पक्षाने तीन आमदारपत्नींना उमेदवारी दिली आहे. विशेष म्हणजे धाराशिवमधील अर्चना पाटील या सुनेत्रा पवार यांच्या जवळच्या नातलगही आहेत.

### अभ्यासक्रमाच्या...

प्रश्नपत्रिकेवर पॅटर्न-२०२२ असेही लिहिण्यात आले होते.

मात्र, परीक्षेला सुरुवात होताच विद्यार्थ्यांना प्रश्नांमध्ये बदल झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ या विषयाच्या प्राध्यापकांना कळवले. त्यानंतर अर्ध्या तासातच परीक्षा विभागाने झालेली चूक मान्य करत काही वेळातच नवीन पॅटर्न-२०२२ या अभ्यासक्रमाचा पेपर पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानुसार ११:३० वाजता नवीन अभ्यासक्रमाचा पेपर संबंधितांना मिळाला. त्यानंतर ११:३० ते १:३० यावेळेत परीक्षा सुरळीतपणे पार पडली.

### चाकुरने नेहमीच....

विरुद्ध महायुती अशी होत आहे, हा वैचारिक लढा आपण देश, राज्य जिल्हा वाचवण्यासाठी लढत आहोत असे ते म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले की, या विद्यमान सत्तेला आपल्याला पराभूत करायचे आहे, सध्याचे भाजप खासदार हे चाकूर तालुक्याचे आहेत पण ते लातूर लोकसभा मतदारसंघातील देवणी, लोहा, कंधार तालुक्यात आतापर्यंत फिरकलेच नाहीत. कंत्राटदार उमेदवारा विरुद्ध डॉक्टर उमेदवार अशी लातूर लोकसभेची लढत होत आहे. लातूरच्या राजकारणाची उज्वल परंपरा आहे, त्यामुळे लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठीशी आपण सर्वांनी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले.

### सामाजिक...

शोभा यात्रा यांना अडथळा होवू नये, यासाठी शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच अडथळा होवू शकणाऱ्या विद्युत वाहिन्या हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल. मिरवणूक, शोभा यात्रा मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठीही विविध उपाययोजना करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. बावकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच पोलीस उपाधीक्षक श्री. फुंदे यांनी आभार मानले.

सर्व समाज बांधवांना मतदार जागृतीची शपथ

शांतता समितीच्या बैठकीला उपस्थित सर्व समाज बांधवांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने मतदार जागृतीची शपथ देण्यात आली. स्वीप कक्षाचे रामेश्वर गिल्डा यांनी शपथ वाचन केले. सण, जयंती उत्सव काळात आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदार जागृती करून जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी यावेळी केले.

## दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर

१८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८





# यशवंत

शुक्रवार दिनांक०५ एप्रिल २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# विकसित भारत निर्माणसाठी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा- चंद्रशेखर बावणकुळे





**उदगीर (प्रतिनिधी)** विकसित भारत निर्माणासाठी भारतीय जनता पार्टी महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांना सर्वाधिक मताधिक्याने विजयी करा असे अवहान भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांनी केले.

भारतीय जनता पार्टी महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ व भारतीय जनता पार्टीत प्रवेशाबद्दल डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर व माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांचा सत्कार सोहळा जिल्हा परिषदेच्या भव्य क्रिडा मैदानावर आयोजित करण्यात आला होता. या जाहिर सभेत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ना. संजय बनसोडे, लोकसभेचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे, आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी आ. गोविंद केंद्रे, माजी आ. सुधाकर भालेराव,आदि उपस्थित होते तर व्यासपीठावर शिवानंद हैबतपुरे, गणेशदादा हाके, ॲड. व्यंकट बेद्रे, भगवानराव पाटील तळेगावकर, किरण पाटील, संजय कोडगे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जि.प. अध्यक्ष रामचंद्र तिरुके, बस्वराज पाटील कौळखेडकर,प्रेरणाताई होनराव, बापुराव राठोड, देविदास कांबळे, भाजपाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, माजी न.प. उपाध्यक्ष सुधीरभाउ भोसले, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, डॉ. अनिल कांबळे, शिवसेनेचे जयप्रकाश नंदगावे,उत्तराताई कलबुर्गे यांच्यासह भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, रासप आदि महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उदगीरकरांच्या वतीने भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांचा गदा भेट देवून सत्कार करण्यात आला तर डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर व माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांचा चंद्रशेखर बावणकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार निटुरे यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

प्रस्ताविकात माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे म्हणाले की, काँग्रेसमध्ये राहुन भाजपाचे काम करण्यापेक्षा भाजपात गेले तर काय वाईट म्हणून भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला असुन लातूर जिल्हयातील काँग्रेस ही प्रायव्हेट लिमिटेड बनले असुन कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडुन स्वतः चे सोईचे राजकारण करण्याच्या प्रवृत्तीला कंटाळुन भाजपामध्ये प्रवेश केला असुन या पुढील काळात पक्ष जी जबबाबदारी देईल ते काम करणार असल्याचे सांगुन लोकसभेचे महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांना उदगीर, देवणी, जळकोट तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याचे सांगीतले. डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले योगदान मोठे असुन महिला भगिनींना मोटीव्हेशन केला असुन लोकसभा निवडणुकीत महिलांचे मतदान वाढविण्याचे काम करण्याचे सांगीतले. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, भाजपा हे विकासाचे राजकारण करते, जाती पातीचे राजकारण करणाऱ्या लातूरच्या काँग्रेसवाल्यांना यावर बोलण्याचा अधिकार नाही. सुधाकर श्रृंगारे हे मराठवाडयात सर्वात मताधिक्याने निवडुन येतील असे सांगुन, जो काम करेल ते पुढे जाईल भाजपामध्ये डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर व माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांना निश्चितच सन्मानाची वागणुक मिळेल असा विश्वास व्यक्त केला. लोकसभेचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे म्हणाले की, नरेंद्र मोदी हेच उमेदवार समजुन मतदार करावे असे आवाहन केले. ना. संजय बनसोडे यांनी साडेचार वर्षात मतदार संघात केलेल्या विकास कामाचे माहिती सांगुन महायुतीच्या उमेदवारांना उदगीर मतदार संघातुन मताधिक्य मिळुन देणार असल्याचे सांगीतले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने सर्व श्रेत्रात विकासाची भरारी घेतली असुन उर्वरित राहिलेले विकास कामे पुर्ण करण्यासाठी अबकी बार ४०० पार महत्वाची असुन सुधाकर श्रृंगारे यांना मराठवाडयातून सर्वाधिक मताधिक्याने निवडुन देण्याचे आवाहन केले. संचलन प्रविण भोळे यांनी तर आभार पंडीत सुर्यवंशी यांनी मानले. या जाहिर सभेसाठी उदगीर मतदार संघातील मतदार मोठया संख्येने उपस्थित होते.

# चांगल्या वाड्मयाची निर्मिती ही समाजाची गरज-ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर




**उदगीर (प्रतिनिधी)** समाज मन हे अनुकरणशील असते, ग्रंथ निर्मिती ही त्या त्या काळाची गरज असते. सुभाषराव देशपांडे यांच्या साहित्यातून ज्ञानेश्वरीतील व्यक्तिरेखा व कबीरांची साखी हे ग्रंथ समाजासाठी दिशादर्शक आहेत. असे मत ह.भ.प. चैतन्य महाराज देगलुरकर यांनी व्यक्त केले.

**न सुटलेले कोडे....**
ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा व अन्य संतसाहित्य हे आनंदाचे निदान आहे. सुदैवाने आपल्याकडे हे आनंदाचे निदान मोठया संख्येने उपलब्ध आहे मात्र हाती हे आनंदाचे निदान असताना दुःख निर्माण कसे होते? हा प्रश्न म्हणजे न सुटलेले कोडे असल्याचे चैतन्य महाराज देगलुरकर म्हणाले.

सहयोग बँकेच्या सहभागृहात सुभाषराव देशपांडे यांच्या दोन ग्रंथांचे प्रकाशन ह.भ.प. चैतन्य महाराज देगलुरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना चैतन्य महाराज देगलुरकर यांनी संत साहित्याच्या संदर्भाने मांडणी करत उपस्थितांना ज्ञानाचे भांडार खुले केले.यावेळी व्यासपीठावर लेखक सुभाष देशपांडे, कार्यक्रमाचे निमंत्रक रमेश अण्णा अंबरखाने, भाष अभ्यासक खंडेराव कुलकर्णी, व डॉ. रंगनाथ गुडसुरकर चांगल्या वाड्मयाची निर्मिती ही समाजाची गरज असते, समाज स्वतः बदलत नाही विचारांच्या मागे जाणे ही समाजाची मानसिकता असते, त्यामुळे समाजाला दिशा देणाऱ्या चांगल्या वाड्मयाची निर्मिती होणे हे सामाजिक सुचिन्ह असल्याचे मत चैतन्य महाराज यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. कबीराची साखी या ग्रंथ संदर्भाने बोलताना साखी या काव्य प्रकाराचे विश्लेषण करत कबीराची वाणी ही माणसाला जमीनीवर आणणारी वास्तवाचे भान करुन देणारी साखी ही कबीरांचे समाजाला देण असल्याचे महाराज पुढे बोलताना म्हणाले. भावनेबरोबर न वाहणारा व समाजाला जागे करणारा संत म्हणून कबीरांकडे पहावे लागेल असे चैतन्य महाराज पुढे बोलताना म्हणाले. ज्ञानेश्वरीतील व्यक्तिलेखा या ग्रंथासंदर्भाने बोलताना ज्ञानेश्वरी हा गिते पेक्षा प्रगल्भ ग्रंथ असल्याचे ह.भ.प. देगलुरकर म्हणाले. गितेतला धृतराष्ट्र व ज्ञानेश्वरीतील धृतराष्ट्र हा वेगळा आहे हे त्यांनी सोहादरण समजावून सांगीतले. सुभाषराव देशपांडे यांनी हे दोन्ही ग्रंथ लिहुन महत्वाचे कार्य केल्याचे गौरोद्गार ह.भ.प. देगलुरकर महाराज यांनी काढले. यावेळी बोलताना खंडेराव कुलकर्णी यांनी मानवी जीवनाचं उन्नयन कसे करता येईल याचे मार्गदर्शन गितेत असल्याचे सांगीतले. प्रा.डॉ. मनोहर भंडारे यांनी मराठी साहित्याला समृध्द करणारा ग्रंथम्हणुन कबीराची साखी या ग्रंथाचा गौरव केला. सहयोग बँकेचे चेअरमन रमेशअण्णा अंबरखाने यांचेही यावेळी भाषण झाले.सहयोग बँकेच्या वतीने तसेच जेष्ठ नागरीक संघाच्या वतीने ह.भ.प. चैतन्य महाराज देगलुरकर यांचा गौरव करण्यात आला. शशांक जेवळीकर, प्रा. जयंत निलेगावकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सुभाषराव देशपांडे यांनी ग्रंथ निर्मितीची भुमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व सुत्रसंचालन धनंजय गुडसुरकर यांनी केले. प्रा. जयंत निलेगावकर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास शहरातील बुध्दीवादी नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

# मारोती मुंढे यांची पोलीस निरक्षकपदी निवड व सत्कार



**जळकोट (प्रतिनिधी)** तालुक्यातील केकत सिंदगी येथील क्रांती माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी मारोती श्रीराम मुंढे हा पहिल्या बॅचचा विद्यार्थी आहे. तो अतिशय गुणवान आणि नम्र विद्यार्थी म्हणून शाळेत परिचित होता . मारोती श्रीराम मुंडे यांची पोलीस परीक्षेत्र नांदेड विभागातील नायगाव बाजार (खैरगाव ) तालुक्याच्या पोलीस स्टेशन कार्यालय येथे पोलीस निरक्षकपदी निवड झाली आहे . क्रांती माध्यमिक विद्यालयाच्या वतीने शाळेचे मुख्याधापक विलास सिंदगीकर यांनी मानाचा गणवेश, शाल, श्रीफळ, पुष्पहार व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

मारोती मुंढे हा विद्यार्थी शालेय कुस्ती स्पर्धेत राज्यात पहिला आला होता. त्याने आपल्या नोकरीची सुरुवात पोलीस शिपाई या पदापासून केली होती. त्या नंतर त्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षे घवघवीत यश मिळवून नागपूर ( कामटी )येथे पी. एस आय. या पदावर सेवा बजावली . त्यानंतर त्याची बीड येथे ए.पी. आय. या पदावर नियुक्ती झाली .

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापर पोलीस स्टेशनला ते सेवा बजावत असताना महाराष्ट्र शासनाने त्यांची पोलीस निरक्षकपदी नियुक्ती केली आहे . त्यामुळे शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले .यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक - शिक्षेकेतर कमचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**झाडे लावा झाडे जगवा**

# पी.टी.ए च्या उदगीर तालुका अध्यपदी प्रा.गोपाळकृष्ण घोडके तर सचिवपदी प्रा.पांडुरंग फड यांची निवड



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील खाजगी कोचिंग क्लासेसच्या सर्व संचालकांची म्हणजेच पी.टी.ए ची बैठक रविवार दि.३१/०३/२४ रोजी संपन्न होऊन या बैठकीत सर्वानुमते व अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संघटनेच्या अध्यक्षपदी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात एक आगळा-वेगळा ठसा उमटवलेले वक्तृत्व, कर्तत्व व नेत्रत्व यांचा त्रिवेणी संगम असलेले प्रा.गोपाळकृष्ण घोडके सर यांची निवड करण्यात आली याशिवाय या संघटनेच्या उपाध्यक्षपदी प्रा.नवाज मुजेवार सचिवपदी प्रा.पांडुरंग फफ्रड तर कोषध्यक्षपदी प्रा.रामचंद्र बिरादार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीला प्रा.सिद्धेश्वर पटणे, प्रा.अनिल बालुरकर, प्रा.सिद्राम शेटकार, प्रा.प्रदीप वीरकपाळे, प्रा.धनंजय पाटील, प्रा.अविनाश पाटील, प्रा.सुनील ढगे, प्रा.विष्णू गौडगावे, प्रा.संतोष चौधरी, प्रा.पांडुरंग काजबा, प्रा.संजय जामकर, प्रा.मल्लिकार्जुन होलसंबरे, प्रा.शिवाजी हंचनाळे, प्रा.निलेश मंगळूरे, प्रा.सुनील पटणे, प्रा.गंगाधर पाटील, प्रा.बालाजी बिरादार, प्रा.विश्वास टेकाळे, प्रा.नारायण शिंदे सर, प्रा.नंदिनी निटुरे, प्रा.सुनील गरड, प्रा.संतोष पाटील, प्रा. राजेय कुलकर्णी इत्यादी विविध क्लासेसचे तज्ञब संचालक उपस्थित होते. ही निवड पुढील पाच वर्षासाठी करण्यात आली आहे. या निवडीबद्दल अध्यक्ष प्रा.गोपलाकृष्ण घोडके व नूतन सर्व पदाधिकाऱ्यांचा सर्व क्लासेस संचालकाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला यावेळी बोलताना प्रा.गोपाळकृष्ण घोडके म्हणाले की उदगीर पिटीएचा पहिला अध्यक्ष मी होतो म्हणजेच या संघटनेचा पाया मी रचला मध्ये ३-४ वर्ष प्रा. सिद्धेश्वर पटणे यांनी सर्वांनाच सोबत घेऊन अतिशय चांगल्या प्रकारे संघटनेची इमारत थांबवली आता पुन्हा या संघटनेचा कळस योग्य व सक्षम रित्या चढवायची जिम्मेदारी माझ्यावर टाकलेली आहे तरी क्लासेस संचालकांच्या या विश्वासाला तडा जाऊ न देता अतिशय सक्षमपने संघटना चालवेन व कोणत्याच क्लासेस संचालकाला कसलीच अडचण येणार नाही याची पुरेपूर काळजी घेईन असा शब्द दिला. या निवडीबद्दल अध्यक्ष प्रा. गोपाळकृष्ण घोडके यांच्यासह सर्व नूतन पदाधिकाऱ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पत्रकार भवन जागे संदर्भात उदगीर तालुका पत्रकार संघ उच्च न्यायालयात संबधितांना नोटिसा

**उदगीर (प्रतिनिधी)** लातूर जिल्हा परिषदेने मंजूर केलेला पत्रकार भवन जागेचा ठराव बेकायदेशीररित्या बदल केला या संबधी उदगीर तालुका पत्रकार संघाच्यावतीने दाद मागण्यासाठी मुंबई उच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचीका दाखल केली असुन मा.न्यायालयाने प्रतिवादींना नोटिस बजावली आहे.

यासंबधी माहिती अशी की, उदगीर तालुका पत्रकार संघ एफ.४५००या संस्थेने पत्रकार भवनसाठी जागा मिळावी म्हणून लातूर जिल्हा परिषदेकडे लेखी मागणी केली होती .पत्रकार भवनसाठी जागा देण्याचा ठराव सन २०२१ मध्ये सर्वसाधारण सभेत ४०x५० जागा देण्याचा ठराव एकमताने मंजूर केला होता .जि. पं.ने मंजूर केलेली जागा लवकर द्यावी म्हणून वेळोवेळी लेखी पाठपुराव केला परंतू पत्रकार संघास जागा देण्या ऐवजी ना.संजय बनसोडे यांच्या सांगण्यावरुन लातूर जि.प.प्रशासनाने पत्रकार भवन कृती समिति असे बेकायदेशीर रित्या ठरावाची दुरुस्ती केली व या नोंदणीकृत नसलेल्या संस्थेस बेकायदेशिररित्या निधी दिला आहे . उदगीर तालुका पत्रकार संघाच्यावतीने ॲड उध्दव मोमले याचें माफर्फत मुंबई उच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात याचिका दाखल केली आहे.याचिकेची सुनावणी न्यायमुर्ती रविंद्र घुगे व न्यायमुर्ती आर. एम. जोशी यांच्यापुढे चालली असता संबधित प्रतिवादींना नोटिसा बजावण्यात आल्या असुन पुढिल तारिख २९ एप्रिल २०२४ रोजी ठेवली आहे. याचिका कर्त्या तर्फे ॲड उध्दव मोमले ,ॲड मनिष त्रिपाठी ॲड अजय डोणगावकर यांनी तर सरकार पक्षातर्फे आर के. ईगोले यांनी काम पाहिले.